


दैनिक अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २८५
। बुधवार, दि. २९ जुलै २०२६ । पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## अरे ऐकून घे ना राहुल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सादर करण्यात आलेल्या 'सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६' वरून लोकसभेत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये तुफान खडाजंगी पाहायला मिळाली. या विधेयकावरील चर्चेदरम्यान शिवसेनेचे (एकनाथ शिंदे गट) खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी नीट परीक्षा पद्धतीत क्रांतिकारी बदल सुचवत ही परीक्षा वर्षातून दोनदा घेण्यात यावी, अशी महत्त्वाची मागणी केली. दरम्यान, आपल्या भाषणादरम्यान विरोधी पक्षांच्या सततच्या गदारोळामुळे संतापलेल्या श्रीकांत शिंदे यांनी थेट 'अरे राहुल, माझं ऐक!' असा टोला लगावल्याने सभागृहात अचानक राजकीय वातावरण तापले.

## महत्वाचे...

### दिल्लीतील आंदोलनात हत्येपासून दरोड्यापर्यंतचे २८७३ गुन्हेगार!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** नीट प्रवेश परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणावरून नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे क्रॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली भव्य आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. आंदोलनाच्या ठिकाणी सरकारतर्फे फेशियल रेकग्निशन सिस्टीम कॅमेऱ्यांचा वापर करून ही चाचणी घेण्यात आली.या आंदोलनाचा गैरफायदा घेत अनेक समाजकंटक आणि अट्टल गुन्हेगार या आंदोलनात सामील झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सुरक्षा यंत्रणांनी या आंदोलनस्थळी आणि त्याच्या अवतीभवती उपस्थित असणाऱ्या तब्बल दोन हजार आठशे त्र्याहत्तर संशयितांची सखोल चौकशी केली. या तपासणी दरम्यान जवळपास नऊशे ऐंशीपेक्षा जास्त आंदोलकांवर यापूर्वी विविध पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हेगारी खटले दाखल असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. तपास अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोर्च्यामध्ये सहभागी झालेल्या आंदोलकांपैकी किमान १०१ जणांवर थेट हत्येचे गुन्हे नोंद आहेत. (उर्वरीत पान ४ वर)

# दोन्ही राष्ट्रवादींचे विलिनीकरण नाहीच

**विलिनीकरणाच्या चर्चांवर शरद पवारांचे स्पष्ट भाष्य**
**दिल्लीतील भेटीगाठींनंतर रंगलेल्या चर्चांना धक्का**
**एनडीएसोबत जाणार नाही, रोहित पवारांचाही ठाम दावा**

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलिनीकरणाच्या चर्चेला अखेर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी स्पष्ट शब्दांत पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याचा संबंधच नाही, असे स्पष्ट वक्तव्य त्यांनी मंगळवारी बारामती येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना केले.



शरद पवार यांच्या या विधानामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांना नवे वळण मिळाले आहे. काही दिवसांपूर्वी दिल्लीत पार्थ पवार आणि प्रफुल पटेल यांनी शरद पवार यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली होती. त्याआधी शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन जवळपास अर्धा तास चर्चा केली होती. तसेच अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याने दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणाच्या हालचालींना वेग आल्याची चर्चा रंगली होती. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच विलिनीकरणाला सुनेत्रा पवार यांचा विरोध असल्याची चर्चा समोर आली होती. त्यानंतर आता स्वतः शरद पवार यांनीच विलिनीकरणाची शक्यता फेटाळल्याने या सर्व चर्चांमागील वास्तव काय, याबाबत पुन्हा एकदा राजकीय संभ्रम वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनीही शरद पवार हे एनडीएत जाणार असल्याच्या चर्चेचे जोरदार खंडन केले. विद्यार्थ्यांवरील अन्याय आणि त्यांच्या प्रश्नांसाठीच शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, मी विचारांसोबत आणि जनतेसोबत राहिलो आहे. पुढेही एनडीएसोबत जाणार नाही. आमचे बहुतांश आमदार-खासदार लढाईसाठी तयार आहेत, असा ठाम दावा रोहित पवार यांनी केला.शरद पवार यांच्या स्पष्ट भूमिकेनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चांवर तात्पुरता पडदा पडला असला, तरी आगामी राजकीय घडामोडींमुळे या विषयावर पुन्हा नवे समीकरण तयार होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

## कर्जत अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयास कॅबिनेटची मंजुरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत/ जामखेड :** कर्जत-जामखेड या दोन तालुक्यांसाठी कर्जत येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापनेस मंगळवारी (दि २८) मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. कर्जत व जामखेड या दोन्ही तालुक्यातील वकील आणि त्यांच्या पक्षकारांची होणारी गैरसोय आता थांबली आहे. कर्जत वकिल संघटनेने दीर्घकाळ दिलेल्या लढ्यास आणि सभापती राम शिंदे व आ.रोहित पवार यांनी केलेल्या पाठपुराव्यास अखेर यश आले आहे. कर्जत आणि जामखेड येथील पक्षकार आणि त्यांच्या अशिलांना श्रीगोंदा येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात जावे लागत होते. त्यामुळे स्थानिक वकीलांसह न्याय मागणाऱ्याची मोठी गैरसोय होत होती. यासह श्रीगोंद्याचे अंतर लक्षात घेता जाण्या-येण्यासाठी होणारा वेळेचा आणि पैशाचा अपव्ययाचा मनस्ताप सहन करावा लागत होता. (उर्वरीत पान ४ वर)

**कर्जतला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यास महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व सरकारचे आभार. या निर्णयामुळे कर्जत-जामखेडच्या न्याय-व्यवस्थेला नवीन ताकद मिळाली असून मतदारसंघातील वकील बांधव, पक्षकार यासह सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय थांबली आहे. तसेच संबंधित न्यायालयासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ देखील उपलब्ध करण्यास मान्यता प्राप्त झाल्याने स्थानिक बार असोसिएशनचे देखील अभिनंदन.**

– ना. राम शिंदे

**कर्जत-जामखेड मतदारसंघासाठी कर्जतच्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यास अखेर कॅबिनेटने मंजुरी दिल्याबद्दल सरकारचे आभार. यासाठी कर्जत वकील संघटनेने दीर्घकाळ पाठपुरावा केला होता. तसेच या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणून सदरचा प्रस्ताव तातडीने मंजूर व्हावा यासाठी मंत्रालय पातळीवर प्रयत्नशील होतो. कर्जतला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन झाल्याने येथील पक्षकारांचा श्रीगोंदा इथं जाण्यासाठी खर्च होणारा पैसा आणि वेळ वाचणार आहे. स्थानिक सर्व वकील बांधव आणि पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन.**

– आ. रोहित पवार



# गुरुपौर्णिमेच्या पहिल्याच दिवशी साईबाबांच्या झोळीत करोडोंचे दान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** साईबाबांवर देश-विदेशातील लाखो भाविकांची अढळ श्रद्धा असून, भक्तिभावाने ते श्री साईबाबांच्या चरणी विविध प्रकारचे दान अर्पण करत असतात. आज गुरुपौर्णिमा उत्सवाच्या प्रथम दिनी आंध्रप्रदेशातील वेल्लूर येथील मालाधी श्रीनिवास राव यांचे कडून ६४२ गॅम सोन्याचा १ कोटी ३ लाख किंमतीचा सूवर्ण मुकूट, मध्यप्रदेश राज्यातील जबलपूर येथील साईभक्त ए. के. शर्मा यांनी श्री साईबाबांच्या चरणी ४८ ग्रॅम वजनाचा आकर्षक नक्षीकाम असलेला सुवर्ण मुकुट अर्पण केला. या सुवर्ण मुकुटाची किंमत रुपये ६ लाख २८ हजार ७५२ इतकी आहे.



तसेच, गुजरात राज्यातील वडोदरा येथील साईभक्त विजय बालकृष्ण नाईक यांनी साईबाबांच्या चरणी २५.५३० ग्रॅम वजनाचे दोन आकर्षक सुवर्ण 'ॐ' अर्पण केले. या सुवर्ण 'ॐ'ची किंमत रुपये ३ लाख ३४ हजार ४१७ इतकी आहे.



भाविकांकडून अर्पण करण्यात आलेले हे सुवर्ण अलंकार त्यांच्या श्री साईबाबांप्रती असलेल्या अढळ श्रद्धेचे, निस्सीम भक्तीचे आणि समर्पण भावनेचे प्रतीक आहेत.

यावेळी श्री साईबाबा संस्थानच्या वतीने दानशूर साईभक्तांचा सत्कार करून त्यांच्या भक्तीभावाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दरम्यान या सुवर्ण दानामुळे साई संस्थान च्या तिजोरीत सुमारे २ कोटी २६ लाख ३६९ रूपयांच्या ७५५ .५३० ग्रॅम सोन्याची भर पडली आहे .

## पत्रकार सन्मान सोहळ्याला राजकारणाचे ग्रहण!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** ज्येष्ठ संपादक वसंतराव देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्रीरामपूर नगरपालिकेतर्फे पुन्हा सुरू करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय पत्रकार पुरस्काराचे स्वागत होत असले, तरी यंदाची पुरस्कार निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आली नसल्याची चर्चा पत्रकार वर्तुळात रंगली आहे. विशेष म्हणजे, ज्यांची पुरस्कारासाठी निवड झाली आहे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर किंवा पत्रकारितेतील योगदानावर कुणाचाही आक्षेप नसून, निवडीची पद्धत आणि निकष याबाबतच प्रश्न उपस्थित होत आहेत. ज्यांच्या नावे हा पुरस्कार दिला जातो ते स्वर्गीय वसंतराव देशमुख हे सार्वमत या दैनिकाचे संपादक होते. माजी आमदार जयंतराव ससाणे यांना ते गुरुस्थानी होते. देशमुख यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती जपण्यासाठी ससाणे यांनी त्यांच्या नावाने व्याख्यानमाला व पुरस्कार सुरू केला. त्यासाठी पालिकेच्या बजेटमध्ये रीतसर तरतूद करण्यात आली. पुरस्कार निवड पारदर्शकपणे राबवण्यासाठी जिल्ह्यातील सर्व प्रमुख दैनिकांच्या संपादकांची समिती केली जात होती. (उर्वरीत पान ४ वर)

### बंद पडलेला 'प्रेस क्लब' संयोजन समितीत

**श्रीरामपूर नगरपालिकेने आयोजित केलेल्या या प्रतिष्ठेच्या पुरस्कार सोहळ्यात काही वर्षांपूर्वी बंद पडलेला श्रीरामपूर प्रेस क्लब संयोजन समितीत आहे. त्यामुळे पहिल्यांदाच शहरातील दोन पत्रकार संघ संयोजन समितीत घेण्याची नामुष्की पालिकेवर आली. त्याचबरोबर, काही वर्षांपूर्वी पालिकेने जागा देऊन आणि विविध लोकप्रतिनिधींनी निधी देऊन बांधलेले पत्रकार भवन कोणत्या संघटनेकडे हस्तांतरित करायचे? बंद पडलेल्या प्रेस क्लबकडे की, त्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या दोन्हीपैकी एका कोणत्या संघटनेची निवड करावी, असा पेच पालिकेपुढे निर्माण झाला आहे.**

### ज्येष्ठ पत्रकार बहिष्कार घालणार...

**स्व. वसंतराव देशमुख आणि माजी आमदार जयंतराव ससाणे यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे श्रीरामपूर शहर आणि तालुक्यातील जेष्ठ पत्रकार हे देखील या सर्व प्रक्रियेपासून अनभिज्ञ असल्याने त्यांनी सर्वानुमते पत्रकार पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते.**

## डीजे बंद केल्याने तरुणावर कोयत्याने हल्ला

**नान्नज यात्रेतील प्रकार : सहा जणांविरुद्ध गुन्हा**

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** तालुक्यातील नान्नज येथे यात्रोत्सवादरम्यान डीजे बंद केल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणावर कोयता, लोखंडी रॉड, काठ्या, दगड व विटांनी जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि. २७ जुलै) रात्री सुमारे १०.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. या हल्ल्यात इस्माईल (उर्फ बाबा) मेहमुद शेख (वय ३७, रा. पेठ गल्ली, नान्नज, ता. जामखेड) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जामखेड येथील समर्थ हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे जामखेड परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी इस्माईल (उर्फ पै. बाबा) शेख यांनी दिलेल्या माहितीनुसार, नान्नज येथे यात्रोत्सव सुरू असून गावात विविध ठिकाणी नृत्याचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. नान्नज बाजारतळ येथेही टपरी धारक व गावकऱ्यांच्या सहकार्याने नृत्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी नान्नज येथील महेंद्र साळवे यांचा डीजे लावण्यात आला होता. रात्री सुमारे १०.१५ वा. पोलिसांनी नियमानुसार कार्यक्रम बंद करण्याचे आदेश दिल्यानंतर डीजे बंद करण्यात आला. पोलिस इतर कार्यक्रम बंद करण्यासाठी निघून



गेल्यानंतर फीर्यादी इस्माईल शेख हे डीजे चालकाला तेथून निघण्यास सांगत होते. त्याचवेळी त्यांच्या ओळखीचे लक्ष्मण उर्फ पिन्या बबन काळे (रा. आरोळेवस्ती, जामखेड), अनुराग उर्फ सोनु उमेश डाडर व त्यांच्यासोबत आलेले तीन ते चार अनोळखी इसम तेथे आले. त्यांनी डीजे पुन्हा सुरू करा अशी मागणी करत अरेरावी सुरू केली. यानंतर इस्माईल शेख यांनी पोलिसांनीच डीजे बंद केल्याचे सांगितल्यानंतर आरोपी संतप्त झाले. त्यांनी फीर्यादी इस्माईल शेख यांना शिवीगाळ करत दगड, विटा, कोयता, काठ्या व लोखंडी रॉडने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी इस्माईल शेख व त्यांचा भाचा आझम इम्रान पठाण यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान लक्ष्मण उर्फ पिन्या बबन काळे याने शर्टाच्या आत लपवून ठेवलेला कोयता काढून आज याला जिवंत सोडायचे नाही, याचा काटाच काढू अशी धमकी देत इस्माईल शेख यांच्या डोक्यावर, तोंडावर व पाठीवर सपासप वार करून गंभीर जखमी केले. तसेच (उर्वरीत पान ४ वर)

## मराठा आरक्षण कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करा : ना. विखे पाटील

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर/राहुरी :** मराठा आरक्षण कक्षाचे कामकाज अधिक गतिमान आणि प्रभावी करण्यासाठी पुढील सात दिवसांमध्ये आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे भरून हा कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे निर्देश जलसंपदा तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.



मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह विषयाशी संबंधित सचिव तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मराठा समाजाशी संबंधित प्रलंबित विषय आणि शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधांबाबतचा आढावा घेवून अंमलबजावणी बाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. (उर्वरीत पान ४ वर)

## श्रीरामपूरचा पीएसआय लाचलुचपतच्या जाळ्यात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर/शिर्डी :** तक्रारदाराच्या भावाला गुन्ह्यात न अडकवण्यासाठी आणि अटक न करण्याच्या मोबदल्यात तब्बल ४ लाख रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या तथा तडजोडीअंती २ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकासह दोन खाजगी इसमांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने येवला तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिलेल्या तक्रारीनुसार, येवला (जि.नाशिक) येथील (उर्वरीत पान ४ वर)

### लाच मागणी केल्यास आमच्याशी संपर्क साधावा

**नागरिकांसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास किंवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परीक्षेत्र, नाशिक यांच्याशी संपर्क साधावा, असे, आवाहन करण्यात आले आहे.**

# कर्जमाफीच्या आनंदावर 'आयकर'चे विरजन!

**२०१९-२० ते २०२५-२६ दरम्यान एकदाही आयकर भरल्यास अपात्र; हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहणार?**

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेत आयकरासंदर्भातील अटीमुळे हजारो शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शासनाने २०१९-२० ते २०२५-२६ या सहा आर्थिक वर्षांतील आयकर नोंदी तपासण्याचा निर्णय घेतला असून, या कालावधीत एकदाही प्रत्यक्ष आयकर भरलेला शेतकरी कर्जमाफीस अपात्र ठरणार आहे. मात्र, आयकर विवरणपत्र (आयटीआर) भरले असले तरी कर भरावा लागला नसलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे.

### लाभार्थी यादीत १७ लाख शेतकरी

दुष्काळ किंवा इतर संकटाच्या काळात दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मालमत्ता व्यवहार अथवा पूरक व्यवसायातून अतिरिक्त उत्पन्न मिळाल्याने कर भरावा लागलेल्या अनेक शेतकऱ्यांवर या अटीचा परिणाम होणार आहे. त्यामुळे ही अट शेतकरी संघटनांकडून जाचक असल्याची टीका केली जात आहे.

दरम्यान, शासनाने योजनेतील १७ लाख पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध केली असून, अहिल्यानगर जिल्हा १ लाख ३२ हजार ७३४ पात्र शेतकऱ्यांसह राज्यात अव्वल ठरला आहे. त्यापाठोपाठ बुलडाणा (१,१६,४३६), जालना (१,०७,५०५) आणि यवतमाळ (१,०१,४७०) या जिल्ह्यांचा क्रमांक आहे. दुसरीकडे कोकण विभागासह ठाणे, पालघर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांची संख्या तुलनेने अत्यल्प असल्याचे चित्र समोर आले आहे.

### अहिल्यानगरला सर्वाधिक लाभ

**या योजनेसाठी जाहीर केलेल्या पात्र लाभार्थींच्या यादीनुसार, अहिल्यानगर (१,३२,७३४), बुलडाणा (१,१६,४३६), जालना (१,०७,५०५), यवतमाळ (१.०१,४७०) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. तर बीड (९९,६३१), नांदेड (९९,०५४), परभणी (७९,८५५), अमरावती (७६,९७८) इतके जिल्हावार शेतकरी या कर्जमाफी योजनेसाठी पात्र ठरले आहेत. तर कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील पात्र शेतकऱ्यांची संख्या तुलनेनं अत्यंत कमी आहे.**



# झुरळांनी व्यवस्था हादरवली !

भास्कर खंडागळे
अतिथी संपादक
संपर्क : 9890845551

गेल्या शनिवारी दिल्लीच्या जंतर मंतर मैदानावर जे घडलं ते अभूतपूर्व म्हणावं लागेल. देशातील झुरळ म्हणून सांभावना झालेल्या 'जेन झी ' ने जो जिगरबाज लढा दिला त्याची नोंद इतिहासाला घ्यावी लागेल. अहंकारात वावरणाऱ्या व्यवस्थेला 'जेन झी' ने नुसतं हदरवलं नाही, तर ताळ्यावर आणलं. जे झालं, घडलं तो देशातील तमाम राजकीय पक्ष आणि राजकारण्यांसाठी इशारा आहे.या इशाऱ्याकडे जे दुर्लक्ष करतील ते झूरळासारखे झटकले जातील. संत तुकारामांनी शब्दाची महती विशद केलेली आहे. शब्द हे हत्यार असते, असेही बोलले जाते. ज्याची अनुभूती अवघ्या देशाला गेल्या आठवड्यात आली. देशाचे सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत यांनी एका प्रकरणात देशातील तरुणाईची 'झुरळ' अशी संभावना केली.पाठोपाठ असंतोषचा अगडोंब उसळला. याच आगडोंबाच्या आणि असंतोषाच्या गर्भातून चक्क जन्माला आली 'कॉक्रोच जनता पार्टी!'. सुरुवातीला सीजेपी ची दखल घेतली गेली नाही. मात्र अभिजित दिपके याच्या अकाउंटला लाखो फॉलोअर्स लाभल्यावर सदर अकाउंट बंद करण्यात आले. त्यानंतर घडले नीट परीक्षा पेपरफुटीचे महानाट्य. खरं तर सरकारने या पेपरफुटीची गंभीरतेने दखल घेणे आवश्यक होते. पण तसे घडले नाही. नीट परीक्षा रद्द झाली आणि असंतोषाची ठिणगी पडली. याचीही दखल सरकारने घेतली नाही. या ठिणगीचे वनव्यात रूपांतर होईल याचा अंदाज सरकारला आला नाही. त्यामुळे सरकार भ्रमात व गहाळ राहिले. इथेच पुढच्या अनर्थाचे बिजारोपण झाले.. नीट परीक्षा रद्द झाल्याच्या धक्क्याने काही विदयार्थ्यांनी आत्महत्या केल्या. याची गंभीर दखल घेण्याऐवजी सत्ताधा-याकडून चीड आणणारी वक्तव्ये येऊ लागली. यामुळे आगीत तेल ओतल्यासारखे झाले. या वातावरणात सीजेपी चे संस्थापक भारतात आले. त्यांनी विविध ठिकाणी सभा घेऊन केंद्रीय शिक्षण मंत्री धिरेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यायांची मागणी केली. यांचवेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी सहभाग घेतला. या सभांना युवकांचा प्रतिसाद लाभत होता. मात्र सरकारने हे सगळे हलक्यात घेतले. सरकार दखल घेत नसल्याने अखेरीस जंतर मंतरवर आंदोलन सुरु झाले.२० जुलै रोजी मोर्चाचे नियोजन ठरले. . नियोजनानुसार युवकांचा मोर्चा निघाला. त्याचवेळी वांगचूक यांचे उपोषण सुरु होते. सरकारला आणि यंत्रणाना काहीच अंदाज आला नाही. तिकडे संसद अधिवेशन सुरु झाले. विरीधकांना या आंदोलनाचे आयते कोलीत मिळाले. संसदेत व संसदेबाहेर अशा दोन्हीही बाजूनी सरकार खिंडीत सापडले. अशास्थितीत चर्चेची कवाडे उघडण्याऐवजी ताठरं भूमिका घेतली गेली. हे सगळे घडत असतानाच आंदोलक विद्यार्थ्यावर लाठी हल्ला आणि अश्रूधुराचा मारा झाला. इथूनच परिस्थिती हाताबाहेर गेली, नव्हे चिघळली. पुढे काय झाले हा इतिहास सर्वश्रुत आहे. अखेरीस सरकार नमले आणि धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देऊन पायउतार व्हावे लागले. जे सुरवातीलाच करायचे ते शेवटी करावेच लागले. पण तोवर जी नाचक्की व्हायची होती ती होऊन गेली. या आंदोलनाने आणि त्याच्या परिणीतीने देशाच्या लोकशाहीच्या वाटचालीत एक मैलाचा दगड स्थापित केला, हे मात्र नक्की. आता या पार्श्वभूमीवर प्रश्न निर्माण होतो तो, हे सगळं अवचित घडलं कसं? ना नेतृत्वाची फळी, ना संघटन, ना यंत्रणा. तरी इतका उस्फुर्त प्रतिसाद सदर आंदोलनाला याचे चिंतन, मनन आणि आत्मपरीक्षण केवळ सत्ताधारीच नाही, तर तमाम राजकीय पक्ष आणि राजकारण्यांना करावे लागणार आहे. याकडे दुर्लक्ष केले तर तो आत्मघात ठरणार आहे. जगातकीकरणानंतर आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक यांचबरोबरीने राजकीय संदर्भ बदलले आहेत.हा बदल आपल्याच देशात नव्हे, तर जगभर घडला आहे.सर्व क्षेत्रात नवी पिढी अवतरली आहे जिलाच 'जेन झी ' संबोधले जाते. ह्या नव्या पिढीच्या नव्या आकांक्षा, नवी स्वप्ने आहेत. याची दखल न घेता राज्यकर्ते पारंपरिक राजकारणात रमामाण आहेत. हि पिढी ज्ञान असलेली आणि भान असलेली आहे. त्यामुळे नेमके काय घडतेय आणि घडणार याचा अचूक अंदाज या पिढीकडे आहे. दुसरे म्हण जे, या पिढीकडे फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम, ट्विटर अशी संवाद व संपर्क मांध्यमे आहेत. यामुळे जेन झी हि संवादप्रवण आहे, हे विसरता येणार नाही. . या बदलाची नोंद आपल्या राज्यकर्त्यांना घेता आली नाही.खरेतर गेल्यावर्षी आपल्या नेपाळ, बंगलादेश या देशात जे घडले तेव्हाच आपल्या राज्यकर्त्यांनी सावध होणे गरजेचे होते. पण, हे आपल्या देशात होणारच नाही, या भ्रमात राहिले. अति आत्मविश्वास आणि अहंकार यामुळे भ्रमाचा भोपळा फुटला.झुरळ म्हणून हिनवल्या गेलेल्या तरुणाईने जे घडविले त्याकडे सामान्य घटना म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. ह्या अंदोलनाने देशातील राजकारणाला वेगळे वळण मिळणार आहे. हे वळण ध्यानात घेतले तरच राजकीय पक्षाचा निभाव लागेल. अन्यथा केवळ स्वन दाखवून भर्मनिरास करणारे झुरळासारखे झटकले जातील, एवढा इशारा यनिमित्त द्यावासा वाटतो आता या पार्श्वभूमीवर प्रश्न निर्माण होतो तो, हे सगळं अवचित घडलं कसं? ना नेतृत्वाची फळी, ना संघटन, ना यंत्रणा. तरी इतका उस्फुर्त प्रतिसाद सदर आंदोलनाला याचे चिंतन, मनन आणि आत्मपरीक्षण केवळ सत्ताधारीच नाही, तर तमाम राजकीय पक्ष आणि राजकारण्यांना करावे लागणार आहे. याकडे दुर्लक्ष केले तर तो आत्मघात ठरणार आहे. जगातकीकरणानंतर आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक यांचबरोबरीने राजकीय संदर्भ बदलले आहेत.हा बदल आपल्याच देशात नव्हे, तर जगभर घडला आहे. सर्व क्षेत्रात नवी पिढी अवतरली आहे जिलाच 'जेन झी ' संबोधले जाते. ह्या नव्या पिढीच्या नव्या आकांक्षा, नवी स्वप्ने आहेत. याची दखल न घेता राज्यकर्ते पारंपरिक राजकारणात रमामाण आहेत. हि पिढी ज्ञान असलेली आणि भान असलेली आहे. त्यामुळे नेमके काय घडतेय आणि घडणार याचा अचूक अंदाज या पिढीकडे आहे. दुसरे म्हण जे, या पिढीकडे फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम, ट्विटर अशी संवाद व संपर्क मांध्यमे आहेत. यामुळे जेन झी हि संवादप्रवण आहे, हे विसरता येणार नाही. सरकारने वेळीच संवाद साधला असता तर, वेगळे चित्र दिसलें असते. तसें घडले नाही. लोकशाहीतील संवादाचची अपरिहार्यता यातून अधोरेखित झाली. या आंदोलनाने जो इशारा दिलाय,केवळ सत्ताधारीच नाही, तर विरोधी पक्षालाही आहे. तेव्हा विरोधकांनीही 'जितम जितम' करण्यात धन्यता मानण्यायची घोडचूक करु नये. खरेतर गेल्यावर्षी आपल्या शेजारील नेपाळ, बंगलादेश या देशात जे घडले तेव्हाच आपल्या राज्यकर्त्यांनी सावध होणे गरजेचे होते. पण, हे आपल्या देशात होणारच नाही, या भ्रमात राज्यकर्ते राहिले. अति आत्मविश्वास आणि अहंकार यामुळे भ्रमाचा भोपळा फुटला. झुरळ म्हणून हिनवल्या गेलेल्या तरुणाईने जे घडविले त्याकडे सामान्य घटना म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. ह्या अंदोलनाने देशातील राजकारणाला वेगळे वळण मिळणार आहे. हे वळण ध्यानात घेतले तरच राजकीय पक्षाचा निभाव लागेल. अन्यथा केवळ स्वन दाखवून भ्रमनिरास करणारे राजकारणी झुरळासारखे झटकले जातील, एवढा इशारा यनिमित्त द्यावासा वाटतो.

# शिंदे गटात रावसाहेब खेवरे यांचा जाहीर प्रवेश

## अहिल्यानगरच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शिवसेनेचे माजी उत्तर जिल्हाप्रमुख रावसाहेब (नाना) खेवरे यांनी ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना (शिंदे गट) मध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यासपीठावरून ''खेवरे नाना, अहो तुम्ही इकडे या'' असे म्हणत त्यांना जवळ बोलावले आणि त्यांच्या कार्याचा गौरव केला.

गेली चार दशके हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी निष्ठावंत राहिलेल्या खेवरे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात शिवसेना संघटन मजबूत करण्यासाठी मोठे योगदान दिले. मात्र पक्षातील फेरबदलांमुळे नाराजी निर्माण झाल्याने जनतेची कामे अधिक प्रभावीपणे करण्यासाठी शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. या प्रवेशासाठी शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी पुढाकार घेतल्याची चर्चा आहे.

प्रवेश सोहळ्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून दोन ते अडीच हजार कार्यकर्ते ठाण्यात उपस्थित होते. कार्यकर्त्यांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी शिंदे यांनी खेवरे यांच्या योगदानाचा योग्य सन्मान केला जाईल, अशी ग्वाही दिली. कार्यक्रमास विधान परिषदेचे उपसभापती सचिन आहेर, माजी मंत्री विजय शिवतारे, माजी खासदार आनंद परांजपे, आमदार रवींद्र फाटक, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, नानांचे खंदे समर्थक डॉ संजय म्हसे, राजेंद्र गुंजाळ सुनील शेलार, ओंकार दरक, विजय शिरसाठ, हमीद चाचा आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. खेवरे यांच्या या प्रवेशामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मक्तापुर शाळेत खाऊंचे वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील मक्तापूर येथील अंगणवाडीसह जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलांना उबाठा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने खाऊंचे वाटप करण्यात आले. शिवसेना मक्तापूर व शिवसेना मीडिया प्रमुख तालुका अध्यक्ष गणेश झगरे यांच्या पुढाकाराने खाऊ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.

निष्ठावंत शिवसैनिक हे उद्धवसाहेब ठाकरे यांच्या पाठीशी ठाम उभे असल्याचे गणेश झगरे यांनी यावेळी बोलतांना सांगितले.यावेळी झालेल्या खाऊ वाटप कार्यक्रम प्रसंगी अंगणवाडी सेविका आशाताई गायकवाड, हिराबाई साळवे,अविनाश गोरखनाथ बर्डे,माणिकचंद साळवे, गोरक्षनाथ नवघरे,सुदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक शकूर इनामदार, सचिन गायकवाड राहुल जामदार मोहन सातपुते,अमोल भागवत यांच्यासह मक्तापूर ग्रामस्थ शिवसैनिक व भीमसैनिक उपस्थित होते

# ३१ जुलैपर्यंत पीक विम्यासाठी अर्ज करा

## कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राज्यात लागू करण्यात आली असून खरीप हंगामातील बाजरी, तूर, मका, सोयाबीन, कापूस, भुईमूग व खरीप कांदा या सात पिकांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. पात्र शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पूर्वी पीक विम्यासाठी अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांनी केले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात यंदा ईफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत पीक विमा योजना राबविण्यात येणार आहे. अधिसूचित महसूल मंडळातील पिकांचे सरासरी उत्पादन उंबरठ्यापेक्षा कमी झाल्यास शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणार आहे. अन्नधान्य व कडधान्य पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के, तर कापूस व खरीप कांद्यासाठी ५ टक्के विमा हप्ता भरावा लागणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, आधारशी संलग्न बँक खाते, जमिनीची कागदपत्रे व पीक लागवड घोषणापत्र आवश्यक आहे. राष्ट्रीय पीक विमा पोर्टल, बँका किंवा सीएससी केंद्रांमार्फत अर्ज करता येणार आहेत. डिजिटल क्रॉप सर्वे अनिवार्य असून अर्जातील माहिती व सर्वेक्षणातील पीक यामध्ये तफावत आढळल्यास सर्वेक्षणातील नोंद अंतिम मानली जाणार आहे. चुकीची माहिती दिल्यास कारवाईसह पुढील पाच वर्षे कृषी योजनांपासून वंचित राहावे लागू शकते, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी कार्यालय किंवा १४४४७ हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गोदावरीच्या पुराचा कहर

## वैजापूर तालुक्यातील १७ गावांवर सतर्कतेची छाया

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर : दिपक बरकसे**

नाशिक जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला प्रचंड पूर आला होता. नदीपात्रातून तब्बल एक लाख क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने वैजापूर तालुक्यातील १७ गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. या संपूर्ण परिस्थितीत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी पुराच्या रौद्ररूपाने ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था मात्र पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. बाजाठाण–कमलपूर आणि अव्वलगाव–खानापूर या मार्गांवरील कोल्हापुरी बंधारे व त्यावरील रस्ते पुराच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेल्याने हजारो नागरिकांचा दैनंदिन संपर्क तुटला आहे.

बाजाठाण आणि अव्वलगाव ही गावे वैजापूर तालुक्यातील असून कमलपूर व खानापूर ही गावे अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीत येतात. अनेक वर्षांपासून या चार गावांमधील सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक व्यवहार या संपर्क मार्गांवर अवलंबून आहेत. त्यामुळे हे मार्ग बंद पडल्याने परिसरातील जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, या परिसरातील अनेक विद्यार्थी दररोज कमलपूर आणि खानापूर येथील शाळा व महाविद्यालयांमध्ये शिक्षणासाठी जातात. याशिवाय शेतकरी दूध विक्री, शेतीसाठी लागणारे साहित्य, बाजारपेठ तसेच इतर अत्यावश्यक कामांसाठी याच मार्गाचा वापर करतात. मात्र पूरामुळे रस्ता वाहून गेल्याने नागरिकांना आता अनेक किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे वेळेचा अपव्यय होत असून इंधन खर्च आणि आर्थिक भारही वाढला आहे.

या घटनेतील सर्वात गंभीर बाब म्हणजे, बंधारे आणि रस्त्यांचे मोठे नुकसान होऊनही संबंधित प्रशासनातील एकाही अधिकाऱ्याने अद्याप घटनास्थळी भेट दिलेली नाही. नुकसानाचा पंचनामा करण्यात आलेला नाही किंवा दुरुस्तीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही सुरू झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र



नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या या उदासीन भूमिकेमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, अव्वलगाव–खानापूर मार्ग लवकर सुरू व्हावा यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाची वाट न पाहता स्वतःच पुढाकार घेतला आहे. गावकऱ्यांनी वर्गणी गोळा करून रस्त्याच्या तात्पुरत्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाने तातडीने मदतीसाठी पुढे आले नाही, तर विद्यार्थ्यांचे शिक्षण, शेतकऱ्यांची कामे आणि नागरिकांचे दैनंदिन जीवन आणखी विस्कळीत होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

माजी पंचायत समिती सदस्य नारायण विखे यांनी प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त कोल्हापुरी बंधारे आणि संपर्क मार्गांची पाहणी करून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करावे, अशी मागणी केली आहे. पूरकाळात केवळ हाय अलर्ट जारी करून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. आपत्ती ओसरल्यानंतर बाधित भागात पोहोचून पुनर्वसन, दुरुस्ती आणि नागरिकांना दिलासा देणे हीदेखील प्रशासनाची तितकीच महत्त्वाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्या हजारो नागरिकांचे लक्ष प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले असून, तुटलेले संपर्क मार्ग कधी पूर्ववत होणार आणि ग्रामस्थांना दिलासा कधी मिळणार, याची सर्वजण आतुरतेने प्रतीक्षा करत आहेत.

# आषाढी एकादशी निमित्त मियावाकी जंगलात विठ्ठल-रुक्मिणी पूजन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने संगमनेर तालुक्यातील कोल्हेवाडी येथे डॉर्फ केटल जंगल कप स्पर्धेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या मियावाकी जंगलामध्ये विठ्ठल-रुक्मिणी पूजनाचा भक्तिमय सोहळा उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात मियावाकी जंगलामध्ये विठ्ठल-रुक्मिणी यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना व विधिवत पूजनाने झाली. उपस्थितांनी ''निसर्ग हीच खरी ईश्वरसेवा'' या भावनेने वृक्षसंवर्धन व पर्यावरण रक्षणाची सामूहिक शपथ घेतली. यावेळी वक्त्यांनी वृक्षलागवड ही केवळ पर्यावरण संवर्धनाची बाब नसून, भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध निसर्ग निर्माण करण्याची जबाबदारी असल्याचे सांगितले. मियावाकी जंगलासारखे उपक्रम जैवविविधता वाढविण्यासोबतच गावाच्या पर्यावरणीय विकासातही महत्त्वाची भूमिका बजावत अ

# आज अकलापूर येथे गुरुपौर्णिमा उत्सव

## विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**साकुर:** संगमनेर तालुक्यातील पठार भागाचे आराध्य दैवत असलेल्या श्रीक्षेत्र आकलापूर येथील श्री दत्त मंदिरात आज बुधवार, (दि.२९ ) जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या भक्तीभावात साजरा होत आहे.या निमित्त महाअभिषेक, होम हवन, पालखी प्रदक्षिणा, महाप्रसाद आणि गुणवंत विद्यार्थी-शिक्षक सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे समाज प्रबोधनकार ह.भ.प. कबीर महाराज आत्तार (सातारा) यांचे सकाळी १० ते साडेबारा वाजता होणारे कीर्तनसेवा होईल. तसेच दिवसभर विविध भजनी मंडळांचे भजन व महाआरतीचे कार्यक्रम होणार आहेत. पुणे, मुंबई, नाशिकसह विविध ठिकाणांहून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, या उत्सवास उपस्थित राहण्याचे आवाहन देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांनी केले आहेत.

# पावसाळ्यातील आजार रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करा ; आ. आशुतोष काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** पावसाळ्यात संभाव्य आजारांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे निर्देश आमदार आशुतोष काळे यांनी दिले. कोपरगाव येथे झालेल्या एकात्म आरोग्य वर्धिनी समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

संततधार पावसामुळे शहर व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पाण्याची डबकी साचली असून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने सतर्क राहून डासांची पैदास होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच डास प्रतिबंधक औषध फवारणीसाठी सर्व यंत्रसामग्री दुरुस्त करून आवश्यक त्या ठिकाणी फवारणी करावी, अशा सूचना आ. काळे यांनी दिल्या.




बैठकीत शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे, ग्रामीण व शहरी आरोग्य संस्थांचे बळकटीकरण, रुग्णालयातील सुविधा व उपचार व्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

आ. काळे यांनी सांगितले की, कोपरगाव शहरातील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे काम प्रगतिपथावर आहे. तसेच माहेगाव देशमुख येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू झाले असून संवत्सर येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले आहे. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी तहसीलदार महेश सावंत, गटविकास अधिकारी स्वप्नील वाळूंज, आरोग्य विभागाचे अधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते.

# इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :**इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरच्या सन २०२६-२७ या वर्षाच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी नेत्रा भक्कड यांच्या हस्ते वैशाली चोपडे यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, डिस्ट्रिक्ट पास्ट ट्रेझरर व नगरसेविका रचना मालपाणी यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्षा वैशाली चोपडे यांनी ''ऋर्ठ्ठ ऋर्थ्रीअॅळीह – वाढा आणि बहारा'' ही वर्षाची संकल्पना जाहीर करत महिलांचे सक्षमीकरण, सदस्यसंख्या वाढ, युवा कौशल्य विकास, मुलींची सुरक्षितता, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, अर्थसाक्षरता आदी विषयांवर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.




यावेळी दीपमाला भोत (उपाध्यक्षा), अश्विनी ढोले (सचिव), प्रियांका शहा (खजिनदार), अश्विनी राठी (आयएसओ), सप्तसिंधू खोसे (संपादक), ममता पोफळे (सीसी) व पूजा हासे (ई-ॲडमिन) यांची कार्यकारिणीत नियुक्ती जाहीर करण्यात आली. क्लबने प्रथमच सोशल मीडियावर अधिकृत उपस्थिती नोंदवल्याबद्दल पूजा हासे यांचा गौरव करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत रचना मालपाणी यांच्या माध्यमातून रोटरी आय हॉस्पिटलला वॉटर फिल्टर-कूलर भेट देण्यात आला. तसेच आधार फाउंडेशनच्या दोन विद्यार्थिनींना शैक्षणिक मदतीचा धनादेश, आनंदवन शाळेतील दहा विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि निमगावजाळी येथील युवा महिला शेतकरी पूजा डेंगळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुण्या नेत्रा भक्कड यांनी नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा देत सेवाभावी कार्य अधिक व्यापक करण्याचे आवाहन केले.

# दोन चिमुरड्यांचा मृत्यू प्रकरणी

## वैद्यकीय अधिकाऱ्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथे चार दिवसांपूर्वी घडलेल्या अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहेत. पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडालेल्या दोन चिमुरड्या मुलींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविणे गरजेचे होते. मात्र, स्थानिक आरोग्य केंद्रात संपर्क साधूनही तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली नाही. वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे या दोन्ही निष्पाप मुलींना आपला जीव गमवावा लागला. या आरोग्य प्रशासनाच्या दिरंगाईमुळे दोन चिमुरड्यांचा मृत्यू कारणीभूत व दोषी वैद्यकीय अधिकाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची आमदार ओगले यांची मागणी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ही घटना अत्यंत वेदनादायी असून प्रशासकीय अनास्थेबद्दल नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहेत.या गंभीर दुर्लक्ष व दिरंगाईला जबाबदार असलेल्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यावर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करावी, दोषी अधिकाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, ग्रामीण भागातील आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा अधिक गतिमान, पारदर्शक आणि सक्षम करण्यासाठी शासनाकडून तातडीने ठोस उपाययोजना राबव्यात.याप्रकरणी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे अधिकृत पत्राद्वारे सविस्तर निवेदन देऊन दोषींवर लवकरात लवकर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# प्रवरेच्या संशोधनाला राष्ट्रीय गौरव!

## 'डोमेस्टिक ऑटोमॅटिक हायड्रोपोनिक युनिट'ला भारत सरकारचे पेटंट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी / प्रवरानगर** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषि शास्त्र संस्थेच्या संशोधनाला आणखी एक मानाचा तुरा लाभला आहे. संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहसंशोधक डॉ. सुनील पाटील यांनी विकसित केलेल्या 'डोमेस्टिक ऑटोमॅटिक हायड्रोपोनिक युनिट' या अभिनव संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट प्रदान करण्यात आले आहे.



हे पेटंट पुढील २० वर्षांसाठी वैध असून प्रवरा कृषि शास्त्र संस्था, संशोधक आणि कृषी क्षेत्रासाठी ही अत्यंत अभिमानाची आणि ऐतिहासिक उपलब्धी मानली जात आहे. या संशोधनात ग्रोइंग मीडिया, पोषक द्रावण, संरचनात्मक रचना आणि स्वयंचलित नियंत्रण प्रणाली या चार महत्त्वपूर्ण नवकल्पनांचा समावेश करण्यात आला आहे.

या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कमी जागेत, कमी पाण्यात आणि कमी श्रमात वर्षभर ताजा, पौष्टिक व सुरक्षित भाजीपाला उत्पादन घेणे शक्य होणार आहे.

त्यामुळे शहरी तसेच ग्रामीण भागातील कुटुंबांना घरच्या घरी स्वच्छ, रसायनमुक्त भाजीपाला पिकविण्याचा प्रभावी पर्याय उपलब्ध होणार आहे. देशभरात शाश्वत शेती, पाणी बचत आणि अन्नसुरक्षेला चालना देणाऱ्या या संशोधनामुळे भविष्यात हायड्रोपोनिक शेतीला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ आदी मान्यवरांनी प्रा. डॉ. उत्तमराव कदम व डॉ. सुनील पाटील यांचे अभिनंदन केले आहे.

प्रवरा कृषि शास्त्र संस्थेच्या संशोधन परंपरेला या पेटंटमुळे नवे बळ मिळाले असून, कृषी क्षेत्रात नावीन्यपूर्ण आणि समाजोपयोगी संशोधन करण्याच्या संस्थेच्या ध्येयाला ही उल्लेखनीय उपलब्धी ठरली आहे. त्यांच्या या पेटंटचा उपयोग संस्थेबरोबरच शेतकरी बांधवांनासह विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी नेहमीच संशोधनाला चालना दिले आहे. त्यांनी दिलेली प्रेरणा ही डॉ. कदम यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली असून संस्थेच्या माध्यमातून अजून संशोधक तयार व्हावे अशी अपेक्षा डॉ.सुस्मिता विखे पाटील यांनी व्यक्त केली.

# द•ख•ल

## विद्या थोरात बनली उक्कलगावची पहिली महिला वकील

**श्रीरामपूर** : तालुक्यातील उक्कलगाव येथील प्रगतशील शेतकरी पोपट अण्णासाहेब थोरात यांची कन्या विद्या पोपट थोरात हिने नुकतीच पुणे येथून एलएलबीची परीक्षा उत्तीर्ण केली आहेत. महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशनने नुकताच तिला व्यवसाय परवाना बहाल केला आहेत. तिच्या यशाचे उकलगाव पंचक्रोशीसह महांकाळवाडगाव परिसरातून कौतुक होत आहेत. विद्या ही खंडकरी नेते स्वर्गीय अण्णापाटील थोरात यांची नात असून उक्कलगाव मधून वकील होणारी ती पहिली मुलगी आहेत. प्रगतशील शेतकरी प्रकाश नानासाहेब थोरात यांची पुतणी आहे.

## धनेश्वर देवस्थानात धार्मिक गीताचे चित्रीकरण



**झरेकाठी** : राहुरी तालुक्यातील धानोरे येथील ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारसा लाभलेल्या प्राचीन धनेश्वर देवस्थानात 'ओ साजणा, आता मुरलीची मधुर तान ऐकव ना...' या धार्मिक अल्बम गीताचे उत्साहात चित्रीकरण झाले. प्रवरा नदीकाठचा परिसर, मंदिर आणि भव्य घाटामुळे या गीताला भक्तिभावाची वेगळीच उंची लाभली आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या काळात जीर्णोद्धार झालेल्या या मंदिराच्या परिसरात एन. पी. व्हिजन फिल्मच्या वतीने आबा निर्मळ व प्रमोद निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली हे गीत साकारण्यात आले. यात राधा-कृष्ण भक्तीपरंपरेतील मधुराभक्ती आणि ईश्वरप्राप्तीची आर्त ओढ प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. या भक्तिमय गीतात ड. प्राजक्ता घोलप, प्रिया निर्मळ, हनुमंत शिंदे, प्रणाली घोलप आणि प्रमोद निर्मळ यांनी अभिनय केला आहे. चित्रीकरणानंतर देवस्थान ट्रस्टच्या वतीने संपूर्ण निर्मिती पथकाचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. आधुनिक माध्यमातून भक्तीचा संदेश पोहोचविणारा हा उपक्रम देवस्थानासाठी नवी ओळख निर्माण करणारा ठरला आहे.

## न्यु इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थी दिंडीचे ग्रामस्थांकडून स्वागत



**माळवाडगाव** : तालुक्यातील मुठेवाडगाव येथील बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे न्यू इंग्लिश स्कूलच्या वतीने गुरुवार (दि.२४) जुलै रोजी अत्यंत उत्साही भक्तीमय वातावरणात विद्यार्थी दिंडीचे गावातून आयोजन करण्यात आले यावेळी ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचेकौतुक करत स्वागत केले. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात ही दिंडी शाळेच्या प्रांगणातून निघून गावच्या प्रमुख मार्गावरून छत्रपती शिवाजी महाराज स्मारक व श्रीसंत तुळशीराम महाराज मंदिर या ठिकाणापर्यंत काढण्यात आली. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक काशीद यांनी दिंडीसाठी मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्व ग्रामस्थांचे, पालकांचे व पदाधिकाऱ्यांचे परिश्रम घेतलेल्या शिक्षक शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी यांचे आभार मानले.

## नकुल कडू यांची भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ नवी दिल्लीच्या व्यवस्थापन समितीवर निवड



**कोल्हार** : देशाच्या सहकार क्षेत्रातील सर्वोच्च संस्था असलेल्या 'भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ' च्या व्यवस्थापन समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत राहाता तालुक्यातील तिसगाव येथील नकुल विलासराव कडू यांनी उल्लेखनीय विजय मिळवला आहे. मल्टिस्टेट मतदार संघातून त्यांनी भाजपचे आमदार संजय भेंडे यांचा पराभव केला. या अटीतटीच्या निवडणुकीत सहकार भारती व भाजप-समर्थित पॅनेलने घवघवीत यश मिळवले. अतिशय कमी वयात राष्ट्रीय स्तरावर संचालकपदी निवड झालेले नकुल कडू हे पहिल्या पिढीतील युवा नेते ठरले असून, त्यांच्या या यशाने अहिल्यानगर जिल्ह्याला राष्ट्रीय स्तरावर मोठे प्रतिनिधित्व मिळाले आहे. ते सध्या सहकार भारतीचे महाराष्ट्र राज्य सचिव व इफकोचे जनरल बॉडी सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## राष्ट्र सेविका समिती सरस्वती व ज्ञानेश्वर महिला मंडळाच्या वतीने दिंडी



**राहुरी** : राहुरी शहरातील राष्ट्र सेविका समिती , मनकर्णिका समिती शाखा व सरस्वती व ज्ञानेश्वर महिला मंडळाच्या वतीने आषाढी एकादशीच्या निमित्ताने दिंडी काढण्यात आली. यावेळी समितीच्या स्वयंसेविकांसह सरस्वती महिला मंडळ , ज्ञानेश्वर भजनी मंडळ तसेच शहरातील महिला भगिनी सहभागी झाल्या होत्या. शहरातील जैन स्थानक परिसरातील सरस्वती देवी मंदिर येथे आषाढी एकादशी निमित्त या सर्व महिला भगिनींनी टाळ आणि लेझीमच्या तालात माऊली माऊली अशा घोषणा देत सुंदर असे रिंगण केले होते. यावेळी लहान मुलींनी विठ्ठल रुक्मिणीचा वेष व टोप परिधान केला होता. दिंडी सोहळ्यामध्ये राष्ट्र सेवा समितीच्या स्वयंसेविका , सरस्वती व ज्ञानेश्वर महिला मंडळाच्या सदस्या सह शहरातील महिला , युवती सहभागी झाल्या होत्या.

## जखमी वारकऱ्याची सुजय विखेंकडून आपुलकीने विचारपूस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : आषाढी वारी पायी दिंडीत वाहनाची धडक बसून जखमी झालेले वारकरी व जेष्ठ शिवसैनिक व वारकरी कुंडलिक (दादा) चिंधे पाटील यांची नेवासा फाट्यावरील शिवसंगीता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष युवा नेते माजी खासदार डॉ.सुजयदादा विखे पाटील यांनी नेवासा तालुक्यातील दौऱ्यादरम्यान असतांना भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. कुंडलिक चिंधे हे भाजपचे नेवासा तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे यांचे वडील असून नेवासा तालुक्यात त्यांनी शिवसेनेच्या माध्यमातून मोठा लढा उभारला होता. पंढरीच्या वारीमध्ये वाहनाने दिलेल्या धडकेत वारकरी असलेले कुंडलिक चिंधे हे जखमी झाले होते. त्यांच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. याविषयी डॉ. सुजय विखे पाटील यांना समजतात त्यांनी जखमी असलेल्या चिंधे यांची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी सदिच्छा व्यक्त करत उपचारांबाबत डॉ. रोहित पाटील यांच्याशी चर्चा केली व आवश्यक त्या सर्व मदतीचे आश्वासन दिले. यावेळी नेवासा तालुका महायुतीचे आमदार विठ्ठलराव लंघे, शिवसेना विधानसभा तालुका प्रमुख भाऊसाहेब वाघ,भाजपचे तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे, भाजपच्या किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अंकुश काळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## त्रिमूर्ती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती प्राथमिक विद्यालय, खडका (त्रिमूर्ती नगर) येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या ४० विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थी गैरहजर राहिले, तर १९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवत विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला. यामध्ये विवान दिनेश घोडे व स्वामिनी सोमनाथ वैद्य यांनी प्रत्येकी २४४ गुण मिळवत अव्वल स्थान पटकावले.

त्याखालोखाल अनन्या योगेश बुधे (२३६), वेदिका गणेश अकोलकर (२१६), श्रावणी संभाजी निकाळके (२०४), ईश्वरी शिवाजी बनकर (२००), आलिया जमीर देशमुख (१९६), श्रुती गणेश चावरे (१९०), प्रतीक वेणूनाथ भास्कर (१८६), श्रेयश श्रीकांत देवकाते (१८४) यांच्यासह अन्य विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश मिळविले. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत शिष्यवृत्ती परीक्षेत सातत्याने यश मिळविण्याची परंपरा विद्यालयाने कायम राखली असल्याचे मुख्याध्यापक योगेश भवर यांनी सांगितले. यशस्वी विद्यार्थ्यांना अर्जुन भांड, विक्रम मगर, बाळासाहेब गटकळ, प्रियंजली कराड, स्नेहा घाडगे व सुचिता जाधव या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे संस्थेच्या अध्यक्षा ड. सुमतीताई घाडगे पाटील, उपाध्यक्षा ड. स्नेहल चव्हाण पाटील, डॉ. श्रुती आमले पाटील, डॉ. गौरव आमले पाटील, चेतन चव्हाण पाटील तसेच प्राचार्य सोपान काळे व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## आईच्या स्मृतीप्रत्यर्थ वटवृक्षाचे रोपण



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील करुले येथील कौसाबाई कारभारी आहेर यांच्या स्मृती कायम जागृत राहावयात तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आहेर परिवाराच्या वतीने स्व. आहेर यांच्या दशक्रियाविधी निमित्त आ. अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ आणि शरद महाराज ढवळे यांच्या हस्ते वटवृक्षाचे रोपण करण्यात आले. स्मृती जपण्याचा सर्वांत चांगला मार्ग वृक्षारोपण करणे हा आहे.आहेर परिवाराने गावातील दशक्रिया विधी च्या ठिकाणी वटवृक्षाचे रोपण करत पर्यावरण संवर्धनाचा आदर्श घालून दिला आहे या उपक्रमांमुळे दिवंगत मातोश्रीच्या स्मृती चिरंतन राहण्या बरोबरच निसर्ग संवर्धनाला हातभार लागत असून पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन उपस्थितांनी केले .यावेळी आहेर परिवार सर्व नातेवाईक आणि करुले ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

## वारकरी परंपरेतून समाजात ऐक्याचा संदेश : रणजित बनकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : आषाढी एकादशीच्या निमित्ताने स्नेहमाला फाऊंडेशनतर्फे आयोजित चौथ्या नृत्यदिंडी सोहळ्यास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पुण्यातील युवा उद्योजक तथा पढेगावचे रहिवासी रणजित बनकर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याने श्रीरामपूर शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. प्रभू श्रीराम मंदिर (मेन रोड) ते बेलापूर रोडवरील सिद्धिविनायक मंदिर या मार्गावर निघालेल्या दिंडीत वारकरी, महिला, युवक-युवती व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि ठिकठिकाणी करण्यात आलेल्या पुष्पवृष्टीमुळे संपूर्ण मार्ग भक्तिमय झाला. रणजित बनकर पाटील यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीची महाआरती करण्यात आली. यावेळी बोलताना रणजित बनकर पाटील म्हणाले, वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा असून भक्ती, समता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. स्नेहमाला फाऊंडेशनचे अध्यक्ष विनोद वाघमारे व राज बाणेदार यांच्या पुढाकारातून झालेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी माजी नगरसेवक रवी पाटील, नगरसेविका जयश्रीताई पाटील, संजय गांगड, ज्ञानेश्वर विखणकर, सुखमित बत्रा, गुलशन कंत्रोड, दत्तात्रय जाधव, राजूभाऊ पठाडे, अण्णासाहेब डावखर, संगीता वाघमारे, तेजस शिंदे, महेश पाटील, लखन फासगे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## आदिवासी कुटुंबाच्या जमिनीवर अतिक्रमणाचा आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील कौठे-मलकापूर येथे आदिवासी समाजाच्या हक्काच्या जमिनीवर अतिक्रमण करून जातीवाचक शिवीगाळ, जिवे मारण्याच्या धमक्या तसेच महिलांशी अश्लील वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधितांवर अॅट्रासिटी कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हे दाखल करावेत, या मागणीसाठी एकलव्य संघटना महाराष्ट्रच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनानुसार, गट क्रमांक १७/४० मधील सुमारे ६ हेक्टर ४० आर 'भोगवटा वर्ग-२' जमीन गणपत विठ्ठल पवार व त्यांच्या कुटुंबाच्या मालकीची असून १९५९ पासून तीन पिढ्यांपासून या जमिनीची मशागत केली जात आहे. मात्र, गावापासून दूर असलेल्या या जमिनीवर कारभारी गणपत शिंदे व त्यांच्या मुलांनी बेकायदेशीर अतिक्रमण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. पवार कुटुंबाने याबाबत जाब विचारला असता जातीवाचक शिवीगाळ, महिलांशी अश्लील वर्तन, जिवे मारण्याच्या धमक्या तसेच शेतात जाण्यास मज्जाव करून धक्काबुक्की केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. हा प्रकार आदिवासी कुटुंबाला त्यांच्या हक्काच्या जमिनीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी एकलव्य संघटनेचे तालुकाध्यक्ष अनिल बर्डे यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार सुभाष कदम, प्रांताधिकारी अरुण उंडे आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. आरोपींवर ट्रासिटी, फसवणूक, अतिक्रमण व विनयभंगाचे गुन्हे दाखल करून पीडित कुटुंबाला तातडीने न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी भाऊसाहेब माळी, बाळकृष्ण दरेकर, महेश बर्डे, उत्तम जाधव, गोरख बर्डे, लक्ष्मण पवार यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

समस्त गावकरी मीरजगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीमती भागुजी मरीबा अवचर रा मीरजगाव ता कर्जत जि अहिल्यानगर यांनी आई नामे श्री/कै.जानकाबाई मरीबा अवचर या नावे जन्म मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू मीरजगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि २०/०५/१९६६ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि १७/१२/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन ह १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**रवि सतवन**
**तहसिलदार कर्जत**

## शेतकऱ्यांच्या सहकार्याने शिवपानंद रस्ता झाला खुला; प्रशासनाच्या कारवाईला यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा-बऱ्हाणपूर रस्त्यालगत बापूसाहेब थिटे यांच्या वस्तीपर्यंतचा शिवपानंद रस्ता प्रशासनाच्या प्रयत्नातून व शेतकऱ्यांच्या सहकार्याने खुला करण्यात आला. सुमारे दोन ते अडीच किलोमीटर लांबीच्या या रस्त्यावर वेड्या बाभळींसह इतर झाडांचे अतिक्रमण झाल्याने वाहतूक आणि पायी ये-जा करणे अवघड झाले होते. पावसाळ्यात शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.



या समस्येबाबत परिसरातील शेतकऱ्यांनी स्वाक्षरी मोहीम राबवून महसूल विभागाकडे निवेदन दिले होते. त्याची दखल घेत प्रशासनाने नियोजनबद्ध कारवाई करत तीन जेसीबी व दोन ट्रॅक्टरच्या सहाय्याने अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा केला. या रस्त्याचा लाभ परिसरातील सुमारे १०० ते १५० शेतकऱ्यांना होणार आहे. या कामासाठी १२ शेतकऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली असून पुढील टप्प्यात रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

तहसीलदार संजय बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली मंडल अधिकारी अमृता पडोळे व ग्राम महसूल अधिकारी संदीप बोरुडे यांनी ही कारवाई यशस्वी केली. यावेळी सरपंच रावसाहेब दहातोंडे उपस्थित होते.

सोनई पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला. रस्ता खुला झाल्याने शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले. प्रशासन व शेतकरी यांच्या वतीने रस्त्याची संपुर्ण पाहणी करून आजूबाजूचे अतिक्रमण काढण्यासंदर्भात शेतकऱ्यांशी चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सदरचे अतिक्रमण सामंजस्यांने विना तंटा काढण्याचे ठरले आणि ते काढण्यात यश देखील आले.

## श्रीरामपूरकरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

### उघड्या खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील साधना हॉटेलपासून बेलापूर रोडवरील नव्याने उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वारापर्यंतच्या रस्त्याच्या मध्यभागी मोठ्या चेंबरच्या झाकणांसाठी खोदण्यात आलेले सात ते आठ खड्डे अनेक दिवसांपासून उघडेच असल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या खड्ड्यांमुळे दररोज लहान-मोठे अपघात घडत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, भुयारी गटार योजनेचे काम बंद झाले असल्यास हे खड्डे अद्याप का बुजविण्यात आले नाहीत, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या या खड्ड्यांवरून दुचाकी व चारचाकी वाहने जाताना मोठा धोका निर्माण होत असून अनेक वाहनांचे नुकसानही झाले आहे. भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

या पार्श्वभूमीवर नगरपालिका प्रशासनाने तातडीने या ठिकाणांची पाहणी करून उघडे खड्डे कायमस्वरूपी बुजवावेत किंवा सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

वेळेत कार्यवाही न झाल्यास नागरिकांच्या सुरक्षेसाठी तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला असून त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असे नागरिकांनी स्पष्ट केले आहे.

# पान १ वरुन

## श्रीरामपूरचा पीएसआय लाचलुचपतच्या जाळ्यात

तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यात तक्रारदाराच्या 'भावाला' आरोपी न करणे आणि 'अटक न करण्यासाठी' तत्कालीन येवला तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक हर्षवर्धन दिलीप बहिर यांनी खाजगी इसमांच्या माध्यमातून लाचेची मागणी केली होती.याप्रकरणी लोकसेवक पो.उप.नि.हर्षवर्धन बहिर यांच्या सांगण्यावरून व त्यांच्या वतीने खाजगी इसम सुनील शिवाजी बोराडे याने तक्रारदाराकडे सुरुवातीला ४ लाख रुपये लाचेची मागणी केली. तसेच, ९ एप्रिल २०२६ रोजी तक्रारदाराशी भेट करून देण्याकरिता फोन पे द्वारे ५०, त्यानंतर तडजोडीअंती २ लाख ५० हजार रुपये लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शवली.या संपूर्ण गुन्ह्यात दुसऱ्या खाजगी इसमाने, म्हणजेच जगदीश तुकाराम बोराडे याने तक्रारदाराला लाच देण्याबाबत प्रोत्साहन दिले होते. त्यानुसार या लाचेप्रकरणी हर्षवर्धन दिलीप बहिर (पोलीस उपनिरीक्षक, तत्कालीन नेमणूक- येवला तालुका पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण, सध्या नेमणूक- श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन),खाजगी इसम सुनील शिवाजी बोराडे (वय ३४, व्यवसाय, शेती, रा. पाटोदा, ता. येवला, जि. नाशिक), जगदीश तुकाराम बोराडे (वय ३७, व्यवसाय, हार्डवेअर दुकान, रा. पाटोदा, ता. येवला, जि. नाशिक) या तिंघा आरोपींविरुद्ध येवला तालुका पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (कलम ७ अ, १२) अन्वये (दि. २७) जुलै रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक पुनम केदार, पोलीस योगेश भास्कर शिंदे, तपास अधिकारी राहुल कुमार नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार गणेश निंबाळकर, नितीन विष्णू नेटारे, पोलीस शिपाई सुरेश चव्हाण, चालक पोलीस शिपाई समीर शेख यांनी कारवाई केली.

## डीजे बंद केल्याने तरुणावर कोयत्याने हल्ला

दुसरा आरोपी अनुराग उर्फ सोनु उमेश डाडर याने लोखंडी रॉडने मारहाण केली, तर इतर अनोळखी साथीदारांनी काठ्या व दगडांनी बेदम मारहाण करण्यात आली. घटनेनंतर नान्नज बसस्थानक परिसरातील सर्व दुकानदारांनी आपआपले दुकान बंद केले. यावेळी परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमा होताच सर्व आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. गंभीर जखमी झालेल्या इस्माईल शेख यांना त्यांचा भाचा आझम पठाण व ग्रामस्थांनी तातडीने जामखेड येथील समर्थ हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले.दरम्यान, हल्लेखोरांनी त्यानंतर नान्नज येथील शिवाजी चौकात सुरू असलेल्या शरद उर्फ दादा राजे भोसले यांच्या सांस्कृतिक नर्तिकाचा नृत्य कार्यक्रमाच्या ठिकाणी जाऊन डीजेच्या गाडीच्या काचा दगडांनी फोडल्या तसेच गाडीवर कोयत्याने वार करून नुकसान केल्याचाही आरोप नागरिकांनी केला आहे.या प्रकरणी इस्माईल मेहमुद शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून लक्ष्मण उर्फ पिऱ्या बबन काळे, अनुराग उर्फ सोनु उमेश डाडर आणि त्यांच्यासोबत असलेल्या तीन ते चार अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे . घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षिरसागर, व पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी रात्री घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित मोरे हे करित आहेत.

## दिल्लीतील आंदोलनात हत्येपासून दरोड्यापर्यंतचे २८७३ गुन्हेगार!

तसेच ६२ जणांवर हत्येचा प्रयत्न केल्याचे गुन्हे दाखल आहेत. या व्यतिरिक्त २८४ लोकांवर जबरी चोरी, २२९ जणांवर बेकायदेशीर घातक शस्त्रे बाळगणे, १३५ जणांवर सोनसाखळी चोरी आणि १९ जणांवर अपहरणाचे खटले सुरू आहेत. महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत ६१ जणांवर बलात्कारासारखे अतिशय गंभीर गुन्हे असून २५ जणांवर विनयभंगाचे खटले आहेत. तसेच ६ आंदोलकांवर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे नोंद आहेत. यातील अनेक संशयित हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर एकापेक्षा जास्त खटले प्रलंबित आहेत.

## मराठा आरक्षण कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करा : ना. विखे पाटील

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यां प्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०५.०६.२०२६ च्या शासन निर्णयाची सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी विनाविलंब व तात्काळ अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रलंबित असलेल्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रांच्या सर्व प्रकरणांचा निपटारा तातडीने व प्राधान्यक्रमाने करावा.तालुकास्तरीय वंशावळ समितीस मुदतवाढ देण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करण्याचे आदेश सामाजिक न्याय विभागाला बैठकीत देण्यात आले आहेत.अधिसंख्य पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियमित सेवा विषयक लाभांबाबत प्रलंबित असलेली कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.अर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातून निवड झालेल्या परंतु मराठा आरक्षण लागू झाल्यामुळे नियुक्ती न दिलेल्या उमेदवारांच्या प्रश्नाबाबत सामान्य प्रशासन विभाग, ऊर्जा विभाग व सर्व संबंधित विभागांनी सर्व कायदेशीर बाबी तपासून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.पोलीस उपनिरीक्षक परीक्षा २०१७ मधील बाधित महिला उमेदवारांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (सेवा), अप्पर मुख्य सचिव (गृह) आणि सचिव (सामाजिक विकास समन्वय) यांनी एकत्रित बैठक घेऊन संबंधित महिला उमेदवारांना आपली बाजू मांडण्यासाठी संधी द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## पत्रकार सन्मान सोहळ्याला राजकारणाचे ग्रहण!

त्या समितीच्या बैठकीत विविध नावांवर चर्चा होत असे. संबंधित पत्रकाराचे जनहिताचे कार्य, सातत्यपूर्ण वृत्तांकन आणि सामाजिक बांधिलकी यांचा विचार करून अंतिम निर्णय घेतला जात असल्याने पुरस्काराची विश्वासार्हता टिकून होती. मात्र यंदा अशी प्रक्रिया झाली का, याबाबत संभ्रम व्यक्त केला जात आहे.दरम्यान, ससाणे यांच्या कार्यकाळानंतर या पुरस्कार सोहळ्यात काही वर्ष खंड पडला. माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक यांच्या कार्यकाळात वादग्रस्त ठरलेले रयत शिक्षण संस्थेचे कर्मचारी व नगरसेवक राजेंद्र पवार हे पडद्यामागून सूत्रे हलवत असल्याची चर्चा शहरात आहे. नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या कार्यकाळातील या पुरस्कार सोहळ्यातही राजकारण शिरल्याची भावना काही पत्रकारांनी व्यक्त केली. त्यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुरस्काराच्या प्रतिष्ठेलाच धक्का बसू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पुरस्कारार्थी निवडीचे निकष, निवड समितीची रचना आणि संपूर्ण प्रक्रिया नगरपालिकेने जाहीर करून नगराध्यक्ष करण ससाणे यांनी निर्माण झालेला संभ्रम दूर करावा, अशी मागणी पत्रकारांमधून होत आहे. वसंतराव देशमुख यांच्या नावाच्या पुरस्काराची प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी पारदर्शकता हाच सर्वोत्तम मार्ग असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, जिल्ह्यातील विविध दैनिकांच्या संपादकांना निवडीबद्दल माहिती नसल्याचे समोर आले. नगराध्यक्ष करण ससाणे यांनादेखील या प्रक्रियेबद्दल पूर्ण माहिती नव्हती. नगरसेवक राजेंद्र पवार यांनीच सर्व नियोजन केल्याचे ते 'राष्ट्र सह्याद्री'शी बोलताना सांगितले.

# शिर्डीत ना. विखे पाटलांच्या इशाऱ्यानंतरही 'ॲपे रिक्षां'चा सुळसुळाट कायम पोलीसांना ना. विखेंच्या सुचनेचा विसर

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काही दिवसांपूर्वी शिर्डी शहरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर आणि अमली पदार्थांच्या तस्करीवर कडक शब्दांत ताशेरे ओढले होते. रात्रीच्या वेळी शिर्डीत बाहेरून येणाऱ्या 'ॲपे रिक्षां' मधून अमली पदार्थांची तस्करी होत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला होता. मात्र, नामदार विखे यांच्या या जाहीर इशाऱ्यानंतरही स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसत नाही. परिणामी, आजही शिर्डी शहरात आणि मंदिर परिसरात ॲपे रिक्षांचा अनाधिकृत सुळसुळाट कायम आहे.



शिर्डीतील तरुणीच्या खुणा नंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी स्पष्ट केले होते की, शिर्डीची पवित्र भूमी उद्ध्वस्त करण्याचे षडयंत्र रचले जात आहे. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन आणि पोलिसांची नजर चुकवण्यासाठी ॲपे रिक्षांचा वापर ड्रग्स व अमली पदार्थांच्या वाहतुकीसाठी केला जात आहे. विना नंबर प्लेटच्या गाड्या आणि संशयास्पद फिरणाऱ्या ॲपे रिक्षांमुळे गुन्हेगारीला संरक्षण मिळत असल्याचा थेट आरोप त्यांनी केला होता. ना. विखे यांच्या या इशाऱ्यानंतर प्रत्यक्षात पोलीस यंत्रणेकडून कोणतीही मोठी धाडसत्र किंवा सातत्यपूर्ण कारवाई पाहायला मिळालेली नाही. दिवसा व रात्रीच्या शिर्डीत प्रवेश करणाऱ्या संख्या मोठी आहे. रेल्वे स्टेशन, बसस्थानक, गेट क्रमांक एक, कोपरगाव नाका, ५०० रूम , व्दारावती व इतर वर्दळीच्या ठिकाणी रिक्षाचा सुळसुळाट .त्या रिक्षा मधे काय मुद्देमाल येतो त्याची साधी चौकशी करण्यासाठी पोलीस यंत्रणा ला विसर पडला आहे . मुख्य मार्गांवर आणि अंतर्गत रस्त्यांवर ॲपे रिक्षा गर्दी दिसून येत आहे . रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या या वाहनांची कसून चौकशी किंवा कागदपत्रांची तपासणी पोलिसांकडून होताना दिसत नाही.

कारवाईचा बडगा उगारला जात नसल्यामुळे अमली पदार्थ तस्कर आणि बाहेरून आलेले गुन्हेगारांना मोकळीक मिळत आहे. पोलीस यंत्रणेची ही नरमाईची भूमिका अनेकांच्या संशयाचा विषय बनली आहे. पालकमंत्र्यांच्या आदेशालाही स्थानिक पोलीस जुमानत नसल्याचे चित्र सध्या शिर्डीत निर्माण झाले आहे.

## तक्रारीनंतरही बेलापूर बसस्थानक उपेक्षित; भिंतीतील भगदाड कायम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर:** बेलापूर बसस्थानकाच्या दुरवस्थेबाबत वारंवार तक्रारी करूनही एसटी महामंडळाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बसस्थानकाच्या पाठीमागील भिंत अज्ञात व्यक्तीने पाडून केलेले भगदाड अद्यापही जैसे थे असून त्याचा सर्रास ये-जा करण्यासाठी वापर होत आहे.

या प्रकाराची माहिती पत्रकार देविदास देसाई व दिलीप दायमा यांनी श्रीरामपूर आगार प्रमुख तसेच अहिल्यानगर येथील एसटी अधिकाऱ्यांना दिली होती. संबंधितांवर गुन्हा दाखल करून भिंत तातडीने दुरुस्त करण्याचे आदेशही देण्यात आले होते. मात्र आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

दरम्यान, बसस्थानक परिसरात रात्री हातगाड्यांचे अतिक्रमण वाढले असून परिसर 'खाऊ गल्ली' बनल्याची नागरिकांची तक्रार आहे. स्वच्छतागृहाच्या अभावामुळे भिंतीतील भगदाडाचा गैरवापर होत असून महिला व विद्यार्थिनींना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यापूर्वी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पाहणी करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. तरीही दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांनी लोकआंदोलनाचा इशारा दिला आहे.

## कर्जमाफीतील शेतकऱ्यांसाठी बेलापूर ग्रामपंचायतकडून विनामूल्य इ -केवायसी सुविधा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** महाराष्ट्र शासनाच्या अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील बेलापूर बु -ऐनतपूर गावातील पात्र शेतकऱ्यांसाठी आधार प्रमाणिकरणाची बेलापूर बु ग्रामपंचायतीच्या वतीने मोफत सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

बेलापूर बु -ऐनतपूर गावातील कर्जमाफीसाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांची यादी शासनाने प्रसिद्ध केली आहे. पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळविणेसाठी आधार प्रामाणिकरण (एघधउ) करणे बंधनकारक आहे.त्याशिवाय शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही.

. यादृष्टीने बेलापूर -ऐनतपूर गावातील कर्जमाफी यादीतील पात्र शेतकऱ्यांच्या आधार प्रामाणिकरणाची सुविधा ग्रामपंचायत कार्यालयात दररोज सकाळी १०.३० ते ५. ०० या वेळेत उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी संबधित शेतकऱ्यांनी आधारकार्ड,फार्मर आय डी, बँक पासबुक इत्यादी कागदपत्रांसह ग्रामपंचायत कार्यालयात येऊन या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच मीना साळवी , उपसरपंच चंद्रकांत नवले, ग्रामपंचायत अधिकारी निलेश लहारे यांच्या सह सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी केले आहे.

## सावळीविहीर येथे मुनी ज्ञान प्रभाजींच्या वाणीतून चातुर्मास श्रवण पर्वास प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील सावळीविहीर बुद्रुक येथील जैन श्रावक संघाच्या वतीने चातुर्मास श्रवण पर्वाला उत्साहात प्रारंभ झाला. पूज्य मुनी ज्ञान प्रभाजी सरल यांच्या प्रवचनातून चातुर्मास काळात धर्मश्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन जैन श्रावक संघाचे अध्यक्ष दिलीपशेठ बाठिया यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात हॉटेल कल्पदीप येथून झाली. हॉटेलचे संचालक वैभव बाठिया यांनी उपस्थितांसाठी चहा-नाश्त्याची व्यवस्था केली. त्यानंतर अध्यायन-पठण करून जैन बांधवांनी भव्य रॅलीद्वारे जैन स्थानकात प्रवेश केला.

या कार्यक्रमाला नवकार युवक मंडळ, महिला मंडळ, व्यापारी वर्ग व सामाजिक कार्यकर्त्यांसह जैन समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी केशरचंद पिपाडा, वैभव बाठिया, जोगेश लोढा, प्रशांत कोठारी, भरत संघवी, अध्यक्ष दिलीपशेठ बाठिया, उपाध्यक्ष विजयराज पिपाडा तसेच विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जनसेवा सप्ताहात प्रेरणादायी कीर्तन संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे आयोजित जनसेवा सप्ताह अंतर्गत झी टॉकीज पुरस्कार प्राप्त कीर्तनकार तथा नामवंत समाजप्रबोधनकार ह.भ.प. अविनाश महाराज भारती (घाटनांदूरकर) यांचे समाजप्रबोधनपर कीर्तन आयोजित करण्यात आले.



या कार्यक्रमाचे आयोजन लोकनियुक्त नगराध्यक्ष संजय जाधव यांच्या पुढाकारातून करण्यात आले. कीर्तनाद्वारे समाजात संस्कार, प्रबोधन आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. उपस्थित भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कीर्तनाचा लाभ घेतला.

यावेळी नगरसेवक संतोष अंबिलवादे, योगेश पाटील, दिनेश गायकवाड, सोपान देशमुख, विशाल गायकवाड, रामेश्वर कदम, बाबासाहेब लगड, अमोल वरकड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निधन वार्ता

## यमुनाबाई भवर



**आश्वी ।** आश्वी खुर्द ता. संगमनेर येथील सामाजिक धार्मिक क्षेत्रात कार्यरत ग.भा. यमुनाबाई पाटीलबा भवर (वय ९१) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना एक मुलगी, जावई, नाती, नात जावई, नातु नातसुना असा मोठा परिवार आहे. आश्वी खुर्द ग्रामपंचायतचे सेवानिवृत्त कर्मचारी पुरुषोत्तम उर्फ बाळासाहेब भवर विज वितरण कंपनीचे सेवानिवृत्त लाईनमन रामदास भवर, सुवर्णा विकास तुरकणे यांच्या मातोश्री तर संदिप भवर विशाल भवर प्रकाश भवर यांच्या त्या आजी होत.

## एकनाथ पानसरे



**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील एकनाथ आसरु पानसरे (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुलगी, सामाजिक कार्यकर्ते संदिप व गणेश पानसरे यांचे ते वडील तर वृत्तपत्र विक्रेते गणपतराव पानसरे व बाळासाहेब पानसरे यांचे ते बन्धु होत.

## बापूसाहेब वाबळे



**माळवाडगांव :** श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथील जुन्या पिढीतील बापूसाहेब खंडेराव वाबळे (वय-९५) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले असून त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले व ४ मुली असून माळवाडगांव येथील जेष्ठ पत्रकार विठ्ठलराव आसने यांचे ते सासरे होत.

## राहुरी - नेवासा तालुक्याला जोडणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्याच्या पूर्वभागातील विविध गावात वरदान ठरत असलेल्या आणि राहुरी आणि नेवासा तालुक्याला जोडणाऱ्या जिल्हा मार्गाची कामाची अवस्था दयनीय झाली असून या भागातील नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करण्याची मागणी याभागातील नागरिकांनी केली आहे.



गेल्या तीन वर्षापासून या प्रमुख जिल्हा मार्गाचे काम सुरू आहे. अनेकदा विविध राजकीय पदाधिकाऱ्यांनी हे काम लवकरच पूर्ण होणार असल्याचे सांगितले मात्र अद्याप पर्यंत हे काम पूर्णत्वास गेले नाही.

या रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा काढली त्याच बरोबर कामही सुरू झाले चार टप्प्यात हे काम होणार होते मात्र आतापर्यंत राहुरी स्टेशन ते आरडगाव हाच टप्पा पूर्ण करण्यात आला त्यातही हे काम आरडगाव पर्यंतही झाले नाही. त्यामुळे तिथपासून उर्वरित रस्त्याचे काम अद्यापी सुरूच आहे. या रस्त्यामुळे याभागात ग्रामस्थांची कुंचबना होत असून राहुरी नेवासा तालुका जोडणारा हा मार्ग कमी अंतराचा आहे मात्र या रस्त्याच्या दुर्दशेमुळे रस्त्याचा वापर थांबला आहे. काही ठिकाणी रस्त्याच्या तयार केलेल्या साइड पट्ट्या पुन्हा उखडल्या आहेत रस्त्यावर मोठमोठी खड्डे पडले आहेत. अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता उडवाउडवीचे उत्तरे मिळत आहेत त्यामुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास उडाला असून काम तत्काळ पूर्ण करण्याची मागणी याभागातील नागरिकांनी केली आहे.

Change in name

I HAVE CHANGE MY OLD NAME LALKHAN ISMAILKHAN PATHAN (BEFORE NAME) TO THE NEW NAME AS LALKHAN ISMAIL PATHAN ( AADHAR No. 8484 1400 4885) FROM VIDE AFFADAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE – SHRIRAMPUR DATE – 28/07/2026

नावात बदल

माझे जुने नाव सलिम भानुभाई पठान असे असून ते बदलून माझे नवे नाव सलिम बन्नुभाई पठान असे आहे. दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून इतर अन्य दुसरी व्यक्ती नाही.

प्रतिज्ञापत्र क्र २५५२२४२१०१२६८१००५६३६५०

दिनांक ३०/०९/२०२५

## निंबळक येथे आज गुरुपौर्णिमा उत्सव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सकल हिंदू नाथ सेनेच्या वतीने आणि संस्थापक अध्यक्ष अशोकभाऊ पालवे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार (दि. २९) रोजी निंबळक येथील एमआयडीसी परिसरातील ओम शिव गोरक्षनाथ मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी अडीच वाजता पालवे महाराज यांच्या आगमनानंतर गुरुपूजन होईल. त्यानंतर भव्य मिरवणूक, महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरूंचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन सकल हिंदू नाथ सेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## कर्जत अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयास कॅबिनेटची मंजुरी

. त्यामुळे कर्जत व जामखेड या दोन्ही तालुक्यांसाठी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्याची मागणी वकील संघटना आणि सर्वसामान्य नागरिकांकडून होत होती. यासाठी दीर्घकाळ पाठपुरावा सुरू होता. मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने देखील सदरची गैरसोय लक्षात घेता वरील मागणी मान्य केली मात्र त्यास आर्थिक तरतुदी अभावी सरकारकडून मंजुरी देण्यात येत नव्हती. कर्जत वकील संघटनेचे तत्कालीन अध्यक्ष ड. कैलास शेवाळे, विद्यमान अध्यक्ष संग्राम ढेरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी याबाबत सरकारकडे पाठपुरावा केला होता. तसेच विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि आ. रोहित पवार यांनी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विधी व न्याय विभागास वारंवार पत्र व्यवहार केला होता. यात कर्जत- जामखेड या दोन तालुक्यांसाठी कर्जतच्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी विधी व न्याय विभागाकडे प्रलंबित असून त्यास तत्काळ मंजुरी देत त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूदीची मागणी केली होती. त्यास मंगळवारच्या मंत्रिमंडळाच्या कॅबिनेटमध्ये मंजुरी देण्यात आली आहे. सामान्य नागरिक, पक्षकार आणि वकील यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी सदरच्या न्यायालयासाठी आवश्यक ती जागा नवीन इमारतीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली असून न्यायाधीशांच्या निवासासाठी आवश्यक करार देखील पूर्ण करण्यात आला आहे.

## टाकळीभान - खोकर रस्त्याची दयनीय अवस्था

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान:** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान ते खोकर मार्गे अशोक कारखाना कडे जाणारा रस्ता महत्त्वाचा असून अनेक लोकवस्तीमार्गे जाणारा व भोकर, खोकर, निपाणी निपाणी वडगाव, अशोक नगर गावांना जोडणारा हा रस्ता आहे. त्याचप्रमाणे अशोक कारखाना ऊस वाहतुक ही मोठ्या प्रमाणावर या रस्त्याने होते. परंतु या महत्त्वाच्या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असून, रस्त्याला मोठे खड्डे पडले आहेत, त्यामुळे दुचाकी व सर्वच वाहनांना या रस्त्यावरून चालण्यासाठी मोठी कसरत होत आहे. खराब रस्त्यामुळे वाहने चालविणे मुश्किल होत आहे. गेल्या पंधरा वर्षापासून या महत्त्वाच्या रस्त्याकडे तालुक्यातील लोकप्रतिनिधी व खासदार लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष झाले असून हा रस्ता तातडीने करण्यात यावा व लोकांच्या सोयी सुविधे साठी व दळणवळणासाठी त्वरित या महत्त्वाच्या रस्त्याचा प्रश्न लोकप्रतिनिधी, खासदार लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालून मार्गी लावावा अशी मागणी या रस्त्याचे रहिवासी नागरिक अजिंक्य आहेर, भारत शेजुळ, तुषार आहेर, कृष्णा खंडागळे, सुनील म्हस्के, सोन्याबापु म्हस्के, अभिजीत आहेर, अरुण खंडागळे, गंगा शेजुळ आदींनी केली आहे व लवकरच या रस्त्याबाबत लोकप्रतिनिधींना सदर नागरिक निवेदन देणार आहेत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

बुधवार दि .२९ जुलैं २०२६

मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२६<br>१८०<br>११७ | ९-५ | २३०<br>७८०<br>०९० | जोड<br>९८-१५-३६-<br>४७-५२ |

कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १५६<br>२४६<br>६६० | २-४ | १४९<br>१३०<br>११२ | जोड<br>२०-९४-८१-<br>७६-४५ |

मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२७<br>२८०<br>२२६ | ०-८ | १७०<br>१८९<br>११६ | जोड<br>०४-३८-१७<br>२६-८९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

# महापालिकेची सिंगल युज प्लास्टिक विरोधात कारवाई

## प्लास्टिक वापरणाऱ्या दुकानदारांकडून ५५ हजारांचा दंड, ३६५ किलो प्लास्टिक जप्त

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार शहरात सिंगल युज प्लास्टिकविरोधात विशेष धडक मोहीम राबविण्यात येत असून, प्लास्टिकचा वापर करणाऱ्या दुकानदारांवर दंडात्मक कारवाईसह प्लास्टिक जप्तीची मोहीम सुरू करण्यात आली आहे. महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी विविध भागांत धाडी टाकून कारवाई करत असून, गेल्या महिनाभरात ५५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून तब्बल ३६५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

**रस्त्यावर कचरा टाकणारे व मनपाचे रस्ते खराब करणाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई**
**प्लास्टिकमुक्त शहरासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा : आयुक्त यशवंत डांगे**

शासनाचा प्लास्टिक बंदीचा आदेश असून प्लास्टिकमुक्त शहर घडविण्यासाठी सर्वप्रथम शहरातील व्यावसायिक, व्यापारी, दुकानदार आणि भाजी विक्रेत्यांनी पुढाकार घेत प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करून कापडी पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले. ते म्हणाले, प्लास्टिकमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत असून नागरिकांच्या आरोग्यावरही त्याचा विपरीत परिणाम होतो. काही नागरिक घंटागाडीत कचरा न टाकता तो रस्त्यावर फेकतात. नागरिकांनी आपला कचरा घंटागाडीतच टाकून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे. तसेच महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता सार्वजनिक रस्ते खोदून शहराचे विद्रूपीकरण करणारे प्रकार टाळावेत. असे कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

यासोबतच शहरात रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर तसेच महापालिकेच्या परवानगीशिवाय रस्ते खोदून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी महापालिकेने ही मोहीम अधिक तीव्र केली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शासनाने सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घालूनही काही दुकानदार, व्यापारी आणि भाजी विक्रेते सर्रासपणे प्लास्टिक पिशव्यांचा वापर करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महापालिकेच्या स्वच्छता विभागाने विशेष तपासणी मोहीम हाती घेत संबंधितांकडून दंड वसूल करून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्त केले.



ही कारवाई मुख्य स्वच्छता निरीक्षक प्रशांत रामदीन स्वच्छता निरीक्षक बाळासाहेब विधाते, सुरेश वाघ, ऋषिकेश भालेराव, ऋषिकेश वाल्मीक, संदीप चव्हाण, प्रसाद उमाप, प्रशांत चांदणे, राजेंद्र सामन आणि शुभम उपलंची यांनी केली.

# द • ख • ल

## श्री वल्लभ प्रतिष्ठानतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त रक्तदान शिबीर व धार्मिक कार्यक्रम

**अहिल्यानगर :** सध्या निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा काहीअंशी कमी करावा, या उद्देशाने येथील श्री वल्लभ प्रतिष्ठानतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीत जास्त इच्छुक रक्तदात्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबीर सावेडी भागातील गुलमोहोर रस्त्यावरील किर्लोस्कर कॉलनीमधील श्री दत्त भाव गुरु मंदिर येथे सकाळी १०.३० ते दुपारी ३ या वेळेत होणार आहे. नावनोंदणी व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या मंदिरात दरवर्षी गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहाने साजरा करण्यात येतो. यानिमित्त अभिषेक व पूजा, आरती व प्रसाद, पालखी मिरवणूक तसेच महाप्रसादाचेही आयोजन करण्यात येते. याचबरोबर यावर्षी रक्तदान शिबीर घेण्यात येत आहे. हे सर्व कार्यक्रम बुधवारी गुरुपौर्णिमेनिमित्त साजरे होणार आहेत, अशी माहिती श्री वल्लभ प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुवर्य विवेक रणभोर आणि श्री वल्लभ प्रतिष्ठानच्या इतर कार्यकर्त्यांनी दिली.



राज्यात प्रसिद्ध असलेल्या नगर जवळील अरणगाव येथे संत बुवाजीबुवा महाराज मंदिराच्या वतीने रथयात्रा काढण्यात आली यामध्ये मोठ्या संख्नेने भाविक सहभागी झाले होते.

## गर्कळ यांच्या राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी पथकाने केली पाहणी



**अहिल्यानगर :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार सन २०२५-२६ अंतर्गत जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा या विद्यालयातील शिक्षक भिकाजी शंकरराव गर्कळ सर यांनी या पुरस्कारासाठी नाव नोंदवले आहे.त्या अनुषंगाने आज शाळेत लक्ष्मण सुपे साहेब अधिव्याख्याता जिल्हा प्रशिक्षण व संशोधन संस्था संगमनेर, कुमावत अरविंद, विस्तार अधिकारी पंचायत समिती अकोले, तसेच शिरसाट साहेब विषय तज्ञ पंचायत समिती पारनेर, सुरेश सोनवणे साहेब विषय तज्ञ पंचायत समिती पारनेर यांचे पथक आले होते त्यानी सर्व पाहणी केली. याप्रसंगी शाळेच्या वतीने त्याचा सत्कार विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक उंडे बी आर,ज्येष्ठ शिक्षक जरांगे एन.बी.,गर्कळ सर,केदारी एन.बी.यांनी केला.या पथका मार्फत ९ वी वर्गाची मराठी विषयाची २० गुणांची परीक्षा घेण्यात आली व मराठी विषयाचा मागील ५ वर्षाचा निकाल पडताळण्यात आला व गुणदान करण्यात आले.

## सिद्ध गोरक्षनाथ मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव

**अहिल्यानगर :** गुरुचरणी भक्ती, श्रद्धा आणि सेवा हीच खरी साधना आहे. गुरुपौर्णिमेच्या पावन निमिताने सिद्ध गोरक्षनाथ मंदिर, देऊळगाव, ता. श्रीगोंदा, येथे उत्सव आयोजित करण्यात आला आहे दिनांक २९ जुलै २०२६ रोजी गुरु पूजन सकाळी ११:३० ते १२:३० यावेळेत होणार आहे तर महाप्रसाद दुपारी १२:३० ते ३:०० या वेळेत होणार आहे .सिद्ध गोरक्षनाथ मंदिर येथे गुरुवर्य तात्या महाराज काटकर हे भक्तांशी संवाद साधणार आहे. श्री क्षेत्र सिद्ध गोरक्षनाथ मंदिर हे श्रीगोंदा तालुक्यातील देऊळगाव(गलांडे) येथे स्थित एक धार्मिक व आध्यात्मिक ठिकाण आहे. या मंदिरात दरमहा भजन, कीर्तन व सत्संग कार्यक्रम आयोजित केले जातात.

## तिरमल समाज जिल्हाध्यक्षपदी बाबू काकडे यांची निवड



**अहिल्यानगर :** नंदीवाले तिरमल समाज संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी बाबू काकडे यांची निवड झाल्याबद्दलआज त्यांचा सत्कार आ. संग्राम जगताप यांनी केला यावेळी आनंदराव शेळके, रावसाहेब काळे पाटील, शिवसेना विनोद साळवे, सुभाष काकडे, बाळु काकडे उपस्थित होते. आ.जगताप म्हणाले नूतन जिल्हाध्यक्षपदी बाबू काकडे यांनी समाजातील एकजूट, शिक्षण, व्यसनमुक्ती आणि समाज संघटन करावे समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मी कायम आपल्या समाजच्या पाठीशी आहे असे ते म्हणाले. नूतन जिल्हाध्यक्ष बाबू काकडे म्हणाले, आमच्या आमच्या सुख-दुःखात आ. संग्राम जगताप नेहमीच सहभागी झाले असून समाजाचे विविध प्रश्न मार्गी लावले आहे जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी ही माझ्यासाठी सन्मानासोबत मोठी जबाबदारी आहे. या पदाच्या माध्यमातून समाजातील शैक्षणिक, सामाजिक व विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावीपणे काम केले जाईल.

## विद्यार्थ्यांच्या शारीरिक,बौद्धिक क्षमता वाढीसाठी क्रीडा,गणित व विज्ञान साहित्याचे वितरण



**अहिल्यानगर :** जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्था संचलित जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा तालुका पारनेर या विद्यालयात आज मंगळवार रोजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना क्रीडा, विज्ञान व गणित साहित्य जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव ॲड. पांडुरंग गायकवाड यांच्या हस्ते विद्यालयाला सुपूर्द करण्यात आले, शैक्षणिक साहित्य मिळाल्यामुळे विद्यार्थ्याचा आनंद दिगुणीत झाला. याप्रसंगी बी.आर.उंडे, एन.बी.जरांगे, गरकळ बी.एस., केदारी एन.बी., नामदेव वाळुंज, भगवान भांबरे, गौरी जगताप व छाया केदारे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# वैद्यकीय अधिकाऱ्यांना धक्काबुक्की ; दोषींवर कठोर कारवाईची मागणी

## वैद्यकीय संघटनेकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घडलेल्या घटनेनंतर महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटनेने दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. या संदर्भात संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

२३ जुलै २०२६ रोजी लोणी व्यंकनाथ प्राथमिक आरोग्य केंद्रात काही सामाजिक कार्यकर्त्यांनी खासगी रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णाला शासकीय १०२ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची मागणी केली. मात्र नियमानुसार खासगी रुग्णालयासाठी ही सेवा देता येत नसल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर काही व्यक्तींनी आरोग्य केंद्रातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांना बाहेर काढून धक्काबुक्की करत शिवीगाळ केली तसेच शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.



सदरच्या प्रकारामुळे आरोग्य केंद्रातील दैनंदिन सेवा विस्कळीत झाली असून उपचारासाठी आलेल्या रुग्णांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागला. तसेच शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेचा श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. संघटनेने शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना बेकायदेशीररीत्या अडविणे,कोंडुन ठेवणे, धमकावणे अथवा सरकारी कामात अडथळा आणणाऱ्यांविरोधात कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याचीही मागणी केली आहे. नागरिकांना गुणवत्तापूर्ण व संवेदनशील आरोग्य सेवा देण्यासाठी डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि निर्भय वातावरण मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनावर जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल ससाणे, सचिव डॉ. सुनील बोराडे, डॉ. दिपाली गायकवाड, डॉ. योगेश कर्डिले, डॉ. इमरान पठाण, डॉ. आयेशा फतिमा, डॉ. प्रशांत मुळे, डॉ. जायभाय यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## श्री सिद्धिविनायक सह. गृहनिर्माण संस्थेची नूतन कार्यकारिणी जाहीर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर शहरातील नामांकित श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेची ५९वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी संस्थेचे चेअरमन मा. श्री. जी. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेत संस्थेच्या सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नूतन संचालक मंडळाची एकमताने निवड करण्यात आली. या निवडीत ज्ञानदेव शहाणे, संजय उगले, नारायणराव गुंड, प्रमोद देवधर, प्रसाद पवार, गौरव झंवर, मदन जामगांकर, स्वप्नील पारख, लिलाराम खन्ना, जयश्री बागडे व शशिकला भालसिंग यांची सर्वानुमते संचालक म्हणून पाच वर्षांसाठी निवड करण्यात आली. नवनिर्वाचित संचालक मंडळाचे उपस्थित सभासदांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# अग्नीतून ३८ वारकऱ्यांचे प्राण वाचविणाऱ्या चौघांना 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम दक्ष नागरिक' पुरस्कार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्री छत्रपती संभाजीनगर ते इचलकरंजी या राज्य परिवहन महामंडळाच्या बसला आग लागल्यानंतर प्रसंगावधान राखत तब्बल ३८ वारकरी प्रवाशांचे प्राण वाचविणाऱ्या चार धाडसी व्यक्तींचा अग्नीपंख फौंडेशन आणि संत शेख महंमद महाराज यात्रा कमिटीच्या वतीने 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम दक्ष नागरिक' पुरस्कार, सन्मानपत्र व गौरवचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.



सोनिया गांधी पॉलिटेक्निकचे प्रा. अमोल नागवडे, वैभव पवार, गणेश शितोळे, दिलीप विघ्ने यांनी पेटलेल्या बससमोर धाडस, प्रसंगावधान आणि माणुसकीचे दर्शन घडवत क्षणाचाही विलंब न करता बस थांबवून सर्व ३८ वारकरी प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले होते. हा गौरव नागवडे साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, सुदाम झराड, गोपाळ मोटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना राजेंद्र नागवडे म्हणाले, आजच्या काळात अनेकजण संकटाच्या प्रसंगी मदत करण्याऐवजी फोटो किंवा व्हिडिओ काढण्यात व्यस्त असतात. प्रा. अमोल नागवडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी क्षणाचाही विलंब न करता जीवाची पर्वा न करता प्रवाशांना बाहेर काढले. त्यांचा सन्मान करून अग्नीपंख फौंडेशनने समाजासमोर प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे म्हणाले, संकटाच्या वेळी कृती आणि कर्तव्य यालाच सर्वाधिक महत्त्व असते. अमोल नागवडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखविलेल्या धाडसामुळे ३८ प्रवाशांचे प्राण वाचले.

यावेळी नानासाहेब कोंथबीरे, अशोक आळेकर, पोपट बोरुडे, किसन आघाव, नवनाथ खामकर, सुदास झुंजरुक, राजू मोटे, सूर्यभान गोलांडे आदी उपस्थित होते.

# महिला उद्योजिकांसाठी शहरात स्वातंत्र्य दिनानिमित्त 'आनंद नगरी खरेदी महोत्सव'

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** स्थानिक महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, महिला गृहउद्योगांना चालना मिळवून देणे तसेच 'व्होकल फॉर लोकल' या संकल्पनेला बळकटी देण्याच्या उद्देशाने राधेय महिला गृह उद्योग यांच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त 'आनंद नगरी खरेदी महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवामध्ये महिला बचत गट, गृहउद्योग चालविणाऱ्या महिला तसेच स्थानिक महिला व्यावसायिकांना आपले विविध प्रकारचे स्टॉल उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.



हा दोन दिवसीय खरेदी महोत्सव शुक्रवार व शनिवार रोजी सकाळी ९ ते रात्री १० या वेळेत जैन स्थानक, शिवगंगा टॉवरजवळ, मार्केटयार्ड, सारसनगर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रदर्शनामध्ये शहरातील नागरिकांसाठी विविध प्रकारची उत्पादने आणि खाद्यपदार्थ एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

या महोत्सवात कपडे, ज्वेलरी, हस्तकला वस्तू, ब्युटी प्रॉडक्ट्स, गेम स्टॉल्स तसेच विविध स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल आकर्षणाचे केंद्र ठरणार आहेत. घरगुती व्यवसाय करणाऱ्या महिलांना आपल्या उत्पादनांचे थेट ग्राहकांपर्यंत घेऊन जाण्याची आणि नवीन ग्राहकांशी संपर्क वाढविण्याची संधी या प्रदर्शनातून मिळणार आहे.

महोत्सवादरम्यान महिलांसाठी सोडत पद्धतीने आकर्षक बक्षिसांचे आयोजन करण्यात आले असून त्यामुळे खरेदीसोबतच मनोरंजनाचीही पर्वणी अनुभवता येणार आहे. यावेळी आयोजक उज्वला मालू आणि स्वाती नागोरी यांनी नागरिकांना ऑनलाईन खरेदीपेक्षा स्थानिक व्यवसायिकांकडून ऑफलाईन खरेदीला प्राधान्य द्या असे आवाहन केले.

# अहिल्यानगरच्या धार्मिक स्थळांवरील ७ दिवसांच्या नोटिसीला स्थगिती द्या

## समाजवादी पार्टीचे आ. अबू आझमी यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदें यांना निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेने रस्त्यांना अडथळा ठरणाऱ्या धार्मिक स्थळांबाबत प्रसिद्ध केलेल्या अवघ्या सात दिवसांच्या मुदतीच्या नोटिसीला तात्काळ स्थगिती देण्यात यावी, संबंधित धार्मिक संस्था व विश्वस्तांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी किमान दोन ते तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी तसेच कायदेशीर व अधिकृत धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्यात यावे, अशी मागणी समाजवादी पार्टीच्या वतीने आ.अबू आझमी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



याबाबत समाजवादी पार्टीचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन यांनी आ. अबू आझमी यांच्याशी सविस्तर चर्चा करून शहरातील परिस्थितीची माहिती दिली. त्यानंतर आ. आझमी यांनी हा विषय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिला. अहिल्यानगर महानगरपालिकेने नुकतीच शहरातील रस्त्यांना अडथळा ठरणाऱ्या मंदिर, दर्गा, मजार, चर्च, गुरुद्वारा, कबर आदी धार्मिक वास्तूंना स्वतःहून हटविणे अथवा स्थलांतरित करण्यासाठी सात दिवसांची मुदत देणारी सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध केली आहे. संबंधित मुदतीत कार्यवाही न झाल्यास अशा वास्तूंना बेकायदेशीर अतिक्रमण समजून महापालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही नोटिसीत देण्यात आला आहे.

अनेक धार्मिक स्थळे ही दशकांपासून अस्तित्वात असून त्यांची कायदेशीर स्थिती, ऐतिहासिक नोंदी, मालकी हक्काची कागदपत्रे आणि अन्य अभिलेख शोधून प्रशासनाकडे सादर करण्यासाठी केवळ सात दिवसांचा कालावधी अत्यंत अपुरा असल्याचा मुद्दाही मांडण्यात आला आहे.

आ. अबू आझमी यांनी उपमुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महापालिका प्रशासनाने कोणतीही एकतर्फी कारवाई करण्याऐवजी संबंधित धार्मिक स्थळांच्या विश्वस्तांना चर्चेसाठी बोलवावे. रस्त्याच्या विकासासाठी स्थलांतर आवश्यक असल्यास संबंधित संस्थांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका घ्यावी. तसेच प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्रपणे तपासणी करून योग्य तो निर्णय घ्यावा. याशिवाय, १९४७ पूर्वी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही धार्मिक स्थळांवर कारवाई करू नये, अशी स्पष्ट भूमिका आ. आझमी यांनी मांडली आहे. ऐतिहासिक आणि अधिकृत धार्मिक स्थळांना कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होणार नाही, याची शासनाने काळजी घ्यावी. अनेक धार्मिक स्थळांकडे आवश्यक कागदपत्रे, सनदी नोंदी व कायदेशीर पुरावे उपलब्ध आहेत. त्यामुळे घाईघाईने निष्कासनाची कारवाई केल्यास कायदेशीर व अधिकृत धार्मिक स्थळांचेही नुकसान होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने प्रत्येक प्रकरणाची सखोल चौकशी करूनच पुढील निर्णय घ्यावा. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात वैयक्तिक हस्तक्षेप करून अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाला योग्य त्या सूचना द्याव्यात, सात दिवसांच्या नोटिसीवरील कारवाई तात्पुरती स्थगित करावी, मुदतवाढ जाहीर करावी आणि कायदेशीर तसेच अधिकृत धार्मिक स्थळांचे संरक्षण सुनिश्चित करावे, अशी आग्रही मागणी समाजवादी पार्टीच्यावतीने करण्यात आली आहे.

## नीट परीक्षेत कमी गुण मिळाल्याने विद्यार्थिनीची आत्महत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** देशाची तरुणाई एकत्र येत आंदोलनाचे फलित हाती येत नीट परीक्षेचा पेपर फुटल्याने केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला. मात्र त्याच नीट परीक्षेत कमी मार्क मिळाल्याने जलालपूर (ता.कर्जत) येथील विद्यार्थिनी अंकिता सुरेश सांगळे हिने नैराश्यातून आत्महत्या करीत आपले जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना घडली. परीक्षेत कमी गुण मिळाल्याने नैराश्यातून कर्जत तालुक्यातील जलालपूर येथील विद्यार्थिनी अंकिता सुरेश सांगळे हिने आत्महत्या करून आपले जीवन संपवले.



तिला नीट परीक्षेत १६६ गुण मिळाले होते. तेंव्हापासून ती नैराश्यातच होती. शनिवारी तिने घरात कोणीच नसताना गळफास लावत स्वताचे जीवन संपवले. दिल्लीतील जंतर-मंतर येथे याच नीट परीक्षेच्या पेपर फुटीच्या निषेधार्थ देशातील तरुणाई एकटवली. आंदोलनाची धार तीव्र ठेवत परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.

## शेवगाव तालुक्यात युरिया खताचा ५० टक्के बफर साठा विक्रीसाठी खुला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** खरीप हंगामात युरिया खताची वाढती मागणी लक्षात घेऊन शासनाने उपलब्ध करून दिलेल्या युरिया खताच्या बफर साठ्यातील ५० टक्के साठा विक्रीसाठी खुला करण्यात आला आहे, अशी माहिती शेवगाव तालुका कृषी कार्यालयाकडून देण्यात आली. तालुक्यातील विविध कृषी सेवा केंद्रांवर युरिया खत उपलब्ध असून, शेतकऱ्यांनी शासनाने निश्चित केलेल्या दरातच खताची खरेदी करावी, असे आवाहन तालुका कृषी विभागाने केले आहे. शासनाने प्रत्येक युरियाच्या गोणीची किंमत २६६ रुपये निश्चित केली असून, त्यापेक्षा जास्त दर आकारण्यास परवानगी नाही.

# सह्याद्री पर्वतरांग औषधी वनस्पतींनी बहरली!

## सह्याद्रीच्या कुशीत डोंगर दर्यात उगवतात रानभाज्या, आदिवासींना हातभार : नवनाथ फलके

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**डिंभे :** सह्याद्रीच्या कुशीत वसलेलाआंबेगाव तालुक्याचा पश्चिम पट्टा सध्या पावसाने जोरदार हजेरी लावल्याने सर्व परिसर हिरवागार झाल्याने दर्या खोऱ्यामध्ये रानभाजांचा व रानमेवा तसेच औषधी वनस्पतींनी येथील परिसर बहरला असून आदिवासींच्या सहजीवनामध्ये वापरल्या जाणाऱ्या रानभाज्या मन वेधून घेत आहेत. सह्याद्री पर्वत रांगेत पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात रानभाज्या उगवतात यात आंबेगाव तालुक्याच पश्चिम पट्ट्याचा प्रामुख्याने सहभाग होतो. भीमाशंकर ,आहुपे, पाटण, बोरघर या भागातील डोंगरदऱ्यामध्ये या रानभाज्या प्रामुख्याने पहावयास मिळतात. येथील आदिवासी बांधव राणा वनात जाऊन या रानभाज्या गोळा करतो तसेच या ठिकाणी येणारा पर्यटक व हौशी पर्यटक या रानभाज्या प्रामुख्याने लक्ष वेधून घेतात कारण वर्षभरात एकदाच मिळणाऱ्या या रानभाज्या खूप आरोग्यासाठी आरोग्यदायी असल्याने आदिवासी बांधव तसेच शहराकडील येणारा पर्यटक प्रामुख्याने या भाज्यांचा आस्वाद घेतो. सध्याच्या औद्योगिकीकरणामध्ये औषधी तसेच कोणत्याही प्रकारे सेंद्रिय तसेच मानवनिर्मित औषधी न मारता येणारे रानमेवा हा आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतो, नैसर्गिकरीत्या उगवलेल्या राणभाज्या ह्या खऱ्या अर्थाने एक पावसाळ्यातील पर्विनीच आहे.रानभाज्यातील सर्वाधिक औषधी तसेच महत्त्वपूर्ण असणारी भाजी म्हणजे करटुली ही महत्त्वाची भाजी ओळखली जाते यामध्ये सर्वाधिक कार्बोहायड्रेटचे प्रमाण असल्याने ही शरीरासाठी खूप आरोग्यदायी असून अशा अनेक भाज्या या सह्याद्री पर्वत रांगेत पाहायला मिळतात. यात वाकडी, रानकुडे, चावीचा बार, टाकळा, भांगरी, कोळूची भाजी, साप कांदा, आघाडा, चाईचे डेर, शेवळे, चिचुर्डे, रुखालू, कवदराच्या कोंबाची भाजी , इत्यादी भाज्यांचा समावेश होतो.

रानभाजी प्रोटीन युक्त असल्याने तसेच पचनासाठी शरीरास आरोग्यदायी आहे . काही चवीला तुरट किंवा कडवट असल्याने यामध्ये चिंच किंवा अनेकदा आंबट पदार्थ घालून या भाज्या आदिवासी बांधव बनवत असतात तसेच अनेक भाज्या ह्या आयुर्वेदिक असून आदिवासी बांधव भोंडरा या वनस्पतीच्या पाल्यात शिजवून त्या आहारात वापरतात. रानभाजा या आरोग्यासाठी फायदेशीर असल्याने आदिवासी बांधव डोंगरदऱ्यात जाऊन त्या गोळा करण्याचा प्रयत्न करत असतो वर्षभरात एकदाच मिळणारी तसेच उदरनिर्वाहाचा साधन म्हणून एक नैसर्गिक संपत्तीच लाभलेली पहावयास मिळते. कारल्यासारखे दिसणारे काटेरी करटुले हे आदिवासींना अधिकच प्रिय असणारी रानभाजी म्हणून ओळखली जाते.



**रानभाज्यांचे महत्त्व प्राप्त व्हावे यासाठी आदिवासी बांधव दरवर्षी अनेक ठिकाणी रानभाजी महोत्सव तसेच वनविभागाच्या मदतीने रानभाजी महोत्सव आयोजित करतात यामध्ये अनेक ठिकाणी रानभाज्यांपासून बनवलेले पदार्थ तसेच रानमेवा विकण्यासाठी ठेवून त्याचे महत्त्व शहरी नागरिकांना पटवून देतात. करटुले, कुरडूची भाजी, भांगरी, टाकळा, शेवळाची भाजी, तसेच चिचुर्डे, चावीचा बार, लोथी, कुडाची फुले, रताळ्याचे कोंब, कवदरी कोंब, आधी वेगवेगळ्या रानभाज्या यामध्ये समावेश होतो ह्या भाज्या आरोग्यास पौष्टिक तसेच जीवन सत्वयुक्त असल्याने शरीरास आरोग्यदायी असतात.**





सह्याद्रीच्या पर्वतरांगेत विशिष्ट काळाकरता उगवणारी रानभाजी आदिवासींना उपजीविकेचे तसेच

या रानभाजी मध्ये नैसर्गिक जीवनसत्व असल्याने ती पचनास सोपी असल्याने रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यास खूप मदत करते.





# खामुंडी येथील जिल्हा परिषद शाळेत वारकरी दिंडीचे उत्साहात आयोजन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर खामुंडी(ता. जुन्नर )येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांमध्ये भक्तिभाव जागृत व्हावा यासाठी दि. २८जुलै रोजी वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी शाळेच्या प्रांगणातून ही दिंडी काढण्यात आली. विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थ भगवी पताका, टाळ, मृदंगाच्या गजरात ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषाने दुमदुमून गेले होते. लहान विद्यार्थी वारकरी वेशात, डोक्यावर टोपी, गळ्यात तुळशीमाळ आणि हात पताका घेऊन सहभागी झाले होते.

शाळेच्या मुख्याध्यापीका सविता हिरे यांच्या हस्ते दिंडीचे पूजन करून प्रारंभ झाला. दिंडी शाळेपासून गावचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ मंदिराच्या प्रांगणातून मुख्य मार्गावरून फिरून पुन्हा शाळेत आली. यावेळी अभंग, भजने आणि वारकरी संप्रदायातील माहिती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितली. याप्रसंगी मुख्याध्यापीका हिरे बोलताना म्हणाल्या , नवीन पिढीला महाराष्ट्राची वारकरी परंपरा, संत साहित्य आणि मूल्ये कळावीत यासाठी शाळेत दरवर्षी अशी दिंडी काढतो. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकता आणि भक्तिभाव वाढतो. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक सुखदेव पथवे, शोभा खर्गे, दिपाली डुंबरे, काशिनाथ इले आणि पालकांनी परिश्रम घेतले. दिंडीच्या समारोपानंतर सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे कौतुक केले आणि शाळेच्या या उपक्रमामुळे गावात आषाढीचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगितले.

# बीजेएस महाविद्यालयातील मोडी कागदपत्र प्रदर्शनाला १३०० जणांची भेट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**वाघोली :** सांस्कृतिक कार्य विभाग, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन आणि भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय मोडी कागदपत्र प्रदर्शनाला विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनाला सुमारे १३०० जणांनी भेट देत महाराष्ट्राच्या ऐतिहासिक दस्तऐवजांविषयी माहिती जाणून घेतली.

प्रदर्शनाचे उद्घाटन पुराभिलेख संचालनालयाचे संचालक सुजितकुमार उगले यांच्या हस्ते झाले. यावेळी भारतीय जैन संघटनेचे संस्थापक सुरेश साळुंके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्रसिंह परदेशी, उपप्राचार्या डॉ. मनिषा बोरा, समन्वयक संतोष





भंडारी, इतिहास अभ्यासक गणेश खोडके, महेश पाटील, शैला जंगम आणि ड. सतीश हरगुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रदर्शनास विजय फापळे, शुभांगी गायकवाड, रामदास औटी, विक्रम बस्तापुरे, तानाजी हंडाळ, नारायण खुळे, डॉ. प्रकाश पांढरमिसे, प्रा. अश्विनी गायकवाड, गणेश सातव यांच्यासह परिसरातील विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट दिली. प्रदर्शनातील दुर्मीळ मोडी कागदपत्रे, ऐतिहासिक नोंदी आणि त्यामागील वारसा याविषयी उपस्थितांनी विशेष उत्सुकता दर्शविली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्या डॉ. मनिषा बोरा यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सहदेव चव्हाण यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. सचिन कांबळे यांनी केले.प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी इतिहास अभ्यासक गणेश खोडके, महेश पाटील, उपप्राचार्या डॉ. मनिषा बोरा, डॉ. भूषण फडतरे, डॉ. सचिन कांबळे, प्रा. बंडू ब्राम्हणे, प्रा. निखील आगळे, डॉ. रुपाली सोनवणे, श्याम पाटील, गिरीष शहा तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शोभाताईंच्या कवितांमधून सकारात्मक स्त्रीजीवनाचे प्रातिनिधिक दर्शन घडते

## शोभाताई हांगे लिखित 'मनातले मोती' कवितासंग्रहाचे प्रकाशन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**





**पुणे :** कवयित्री शोभाताई हांगे यांच्या कवितांमधून ग्रामीण भागातील स्त्रीजीवनाचे वास्तव तरीही सकारात्मक दर्शन घडते, असे प्रतिपादन पुणे शहराच्या अतिरिक्त पोलिस आयुक्त तेजस्वी सातपुते यांनी रविवारी येथे केले. जसे मनात उमटले तसे कागदावर आणण्याचे धाडस आणि पराकोटीचा प्रामाणिकपणा, ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत, असेही त्या म्हणाल्या.

शोभाताई शिवाजीराव हांगे लिखित 'मनातले मोती' या कवितासंग्रहाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. नव्या पेठेतील पत्रकार भवन येथे झालेल्या या कार्यक्रमात कवयित्री शोभाताई हांगे यांच्यासह निवेदिका व कवयित्री लीनता माडगूळकर आंबेकर, समाजसेविका सारिका भरणे, पुणे जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापती अंकिता पाटील, प्रसिद्ध वक्ते प्रा. गणेश शिंदे हे व्यासपीठावर उपस्थित होते. त्याचप्रमाणे शिवाजीराव हांगे, सत्यजीत हांगे, अजिंक्य हांगे, छाया घुले, दुर्गा वाघ, चंद्रकला सानप, शशिकला मुंढे आणि कुटुंबियांची उपस्थिती होती. 22450

तेजस्वी सातपुते पुढे म्हणाल्या, मी स्वतःदेखिल कवयित्री आईची लेक आहे आणि आईच्या कवितांचे पुस्तक प्रकाशित करण्याचा योग, मीही अनुभवला आहे. शोभाताई ग्रामीण जीवनात दीर्घकाळ राहिल्या. जुन्या काळातील परिस्थितीचा विचार करता, त्यांनी सोसलेल्या दुःखातून जन्मलेली अशी त्यांची कविता आहे. ही कविता व्यथा, वेदना जरूर मांडते, पण ती नकारात्मक नाही. शोभाताईंमधील मातृत्व विलक्षण तेजस्वी आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेतून प्रांजळ, निखळ, सरळ अशा सोशिक मनाचे प्रतिबिंब दिसते. प्रकाशित करायच्या म्हणून या कवितांचे लेखन झालेले नाही तर जे सोसले, ते कागदावर उतरविण्याचा प्रयत्न आहे.

# सायबर सुरक्षा तंत्रज्ञान शिक्षण ही काळाची गरज – डॉ पराग काळकर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** आजच्या काळामध्ये माणसाचे जीवन हे पूर्णतः तंत्रज्ञानाने व्यापून टाकलेले आहे. माणूस कुठेही गेला तरी त्याच्यासोबत मोबाईल सारखे तंत्रज्ञान कायमस्वरूपी असते. त्यामुळे, माणसाची सर्व माहिती तंत्रज्ञानाकडे असते. गुन्ह्याचे स्वरूप बदलल्यामुळे तपास यंत्रणा आणि पद्धतही बदलणे गरजेचे असून सायबर सुरक्षा तंत्रज्ञानासंदर्भात माहिती आणि शिक्षण ही आता काळाची गरज बनली आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केले.

ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीज, तंत्रज्ञान विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुनीत बालन ग्रुप आणि न्यूलिफ लाईफ स्पेसेस तर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जिऑलॉजी विभागामध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास' सायबर सुरक्षा संदर्भातील कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते झाले. जीएसटी विभागाच्या अपर महासंचालक (ए.डी.जी, डी. जी.जी.आय) वृंदाबा गोहिल, पुणे एटीएसचे एसपी संभाजी कदम, डॉ. आरती दातार, माधुरी सातपुते , लीना सातपुते, प्राजक्ता गिरी, ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीसचे प्रमुख केतन अत्रे



आदी यावेळी उपस्थित होते.डॉ. पराग काळकर म्हणाले, माणसाच्या बँकेतील व्यवहारापासून ते पर्यटन, दैनंदिन जीवन याची सर्व माहिती मोबाईलमध्ये रोजच्या रोज नोंद होत असते. परंतु अनेक जण याबद्दल अनभिज्ञ असतात. मोबाईल ही आज प्रत्येकाची गरज बनली आहे परंतु मोबाईल संदर्भात प्रत्येकालाच संपूर्णतः माहिती नाही, याचाच फायदा सायबर गुन्हेगार उचलतात आणि विशेषतः जेष्ठ नागरिकांची फसवणूक मोठ्या प्रमाणावर केली जाते. सायबर गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी त्याची संपूर्णतः माहिती असणे ही पहिली पायरी आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या सायबर सिक्युरिटी तंत्रज्ञानासंदर्भात जनजागृती करणाऱ्या कार्यशाळांची गरज आहे. मोबाईलसारखे तंत्रज्ञान प्रत्येक माणूस कोणत्याही वयाचा असला तरी सोबत घेऊन फिरतो. मोबाईल ही गरज असली तरी त्याचे दुष्परिणाम काय आहेत हे अनेकांना माहिती नाही, त्याचे दुष्परिणामही प्रत्येकाने जाणून घेणे गरजेचे आहे. मोबाईल तंत्रज्ञान हे कशाप्रकारे हाताळावे याची जर सर्वसामान्यांना माहिती झाली तर मोठ्या प्रमाणावर सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवता येऊ शकते, असेही डॉ. पराग काळकर यांनी यावेळी सांगितले.वृंदाबा गोहिल म्हणाल्या, सायबर गुन्हेगारी विरोधात तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी पुणे विद्यापीठ आणि ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीस यांनी एकत्र येऊन सुरू केलेला हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. अशा प्रकारच्या अनेक उपक्रमांची गरज आहे. सायबर सुरक्षेसंदर्भात काम करणाऱ्या सर्व संस्थांनी एकत्र येऊन काम केले तर निश्चितच सायबर गुन्हेगारीवर आळा घातला जाऊ शकतो. डॉ. आरती दातार म्हणाल्या, सायबर सुरक्षा संदर्भात तीन दिवस पूर्णतः प्रशिक्षण देण्यासंदर्भातली तंत्रज्ञान विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढाकार घेऊन घेण्यात आलेली ही कार्यशाळा भारतामध्ये बहुतांश पहिलीच कार्यशाळा असावी. या कार्यशाळेचा सर्वांनी अधिकाधिक लाभ घेतला पाहिजे. कार्यशाळेमध्ये बोलताना कुंदन कुमार सराफ म्हणाले, आपल्या मोबाईल मध्ये कोणत्या प्रकारचे एप्लीकेशन डाउनलोड करायचे याची सतर्कता प्रत्येकाने बाळगली पाहिजे.

# सूर्यघर योजनेच्या प्रसारासाठी 'सूर्यरथ' मार्गस्थ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने'ची माहिती घराघरांत पोहोचविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'सूर्यरथ' केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रविवारी मार्गस्थ करण्यात आला.'नॅशनल सोलर एनर्जी फेडरेशन ऑफ इंडिया' (छडएऋख), पीडब्ल्यूसी (झुउ) आणि एनर्जिवा व्हेंचर्स यांच्या सहकार्याने हा सूर्यरथ साकारण्यात आला आहे. पुण्यातील चिखली येथे रविवारी (दि. २६) खासदार जनसंपर्क सेवा अभियाना दरम्यान केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने'च्या सूर्यरथाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. यावेळी महावितरणचे अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर व सिंहाजीराव गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीसह विविध अधिकारी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





पुणे जिल्ह्यात जवळपास ५० हजार घरांवर सौर प्रकल्प उभारण्यात आले असून, राज्यात पुणे जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. या योजनेला आणखी प्रोत्साहन देण्यासाठी या सूर्यरथ शहरांत फिरणार आहे. पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विविध गृहनिर्माण सोसायट्या, मुख्य चौक आणि निवासी भागांत फिरणार आहे. या रथासोबत तज्ज्ञांचे एक पथक असेल, जे नागरिकांना सौरऊर्जा प्रणालीचे फायदे प्रत्यक्ष समजावून सांगेल. तसेच, छतावर सोलर पॅनेल बसवण्यासाठी मिळणारे शासकीय अनुदान, बँक कर्जाची सुविधा आणि ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया याबद्दल जागेवरच सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे.



## ग्रामपंचायत निवी गेव्हंडे तालुका राजगड जिल्हा पुणे

**बी १ जाहिर निविदा नोटीस नंबर ०१ सन २०२६-२०२७**

ग्रामपंचायत निवी गेव्हंडे तालुका राजगड जिल्हा पुणे हे खालील कामासाठी सीलबंद निविदा जिल्हा परिषदेकडील योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदारकडून निविदा मागवित आहे मोहरबंद अर्ज दिनांक: २८-०७-२०२६ ते ०३-०८-२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय निवी गेव्हंडे येथे स्वीकारली जातील. सदरच्या निविदा दिनांक: ०४-०८-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय निवी गेव्हंडे ता. राजगड या ठिकाणी उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे स्वरुप | कामाची अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा शुल्क | अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे गेव्हंडे, ता. राजगड येथे अंतर्गत रस्ता करणे | ६९९९९६/- | ५९०/- | ६९९९/- | ६ महिने |

**अटी व शर्ती :**१) कोणतेही निविदा अर्ज स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा फेटाळणेचा अधिकार ग्रा.प ने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील. ३) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी प्रमाणपत्र, GST प्रमाणपत्र, PAN कार्ड अनुभव प्रमाणपत्र व पूर्ण भरलेली निविदा जोडणे आवश्यक आहे. ४) इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धनादेश डी. डी **ग्रामपंचायत निवी गेव्हंडे** या नावाने काढून तो लिफाफा क्र १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रमांक ०२ उघडण्यात येणार नाही. ५) सदरचे कामे हे मा. उपअभियंता, शाखा अभियंता जि.प बांधकाम उपविभाग राजगड व सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे.६) काम पूर्ण झाल्यानंतरच कामाचे देयक अदा करण्यात येईल.

सही — **ग्रामपंचायत अधिकारी**

सही — **प्रशासक/सरपंच**

**ग्रामपंचायत निवी गेव्हंडे ता. राजगड जि. पुणे**



# दखल

**महाराजस्व अभियाना' अंतर्गत**

## समाधान शिबीरात ८१६ लाभार्थ्यांना थेट लाभ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभाग, जिल्हा प्रशासन आणि आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघातील सर्व शासकीय यंत्रणांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, (२७ जुलै) रोजी शिवगिरी मंगल कार्यालय, मचर येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत विधानसभा मतदारसघस्तरीय भव्य 'समाधान शिबीर पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून आबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार दिलीपराव वळसे पाटील उपस्थित होते. यावेळी आबेगाव व शिरूरचे उपविभागीय अधिकारी, दोन्ही तालुक्याचे तहसीलदार आणि गटविकास अधिकारी, खेड उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी , तालुका कृषी अधिकारी, तालुका बालविकास अधिकारी तसेच आदिवासी विकास विभागाचे अधिकारी याची प्रमुख उपस्थिती होती.पाटील म्हणाले, शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत जलद गतीने आणि एकाच छताखाली पोहोचावा, हा या समाधान शिबीराचा मुख्य उद्देश आहे. सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांचे प्रश्न प्रशासनाने तत्परतेने सोडवून त्याना शासकीय सेवाचा थेट लाभ द्यावा, असे आवाहन पाटील यांनी केले. मागील कार्यक्रमामध्ये आंबेगाव तालुक्यातील ९,७१८ आणि शिरूर तालुक्यातील ५,१५० नागरिकाना विविध शासकीय योजनाचा लाभ मिळाला होता. याच साखळीत आज पार पडलेल्या शिबीरामध्ये दोन्ही तालुक्यांतील एकूण ८१६ लाभार्थ्यांना थेट सेवा व दाखल्याचे वाटप करण्यात आले.

## दूध भेसळ प्रकरणातील १३ फरार आरोपींना तात्काळ अटक करा



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** आंबेगाव तालुक्यात गाजत असलेल्या दूध भेसळ प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच अद्याप फरार असलेल्या १३ आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांनी केली आहे. या संदर्भात पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे तसेच मंचर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वाघमोडे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी फरार आरोपींना लवकरात लवकर अटक करून त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम भूमिका पक्षाच्या वतीने मांडण्यात आली. दूध भेसळीसारख्या गंभीर गुन्ह्यामुळे आंबेगाव तालुक्याची राज्यभर बदनामी झाली असून, अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या कोणालाही अभय मिळता कामा नये, असेही निकम यांनी नमूद केले.तसेच, या प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी पोलीस प्रशासनाने प्रभावी पावले उचलावीत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे आंबेगाव तालुकाध्यक्ष विशाल वाबळे उपस्थित होते.

## लोणी भापकर येथे कोयत्याने जीवघेणा हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभाग, जिल्हा प्रशासन आणि आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघातील सर्व शासकीय यंत्रणांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, (२७ जुलै) रोजी शिवगिरी मंगल कार्यालय, मचर येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत विधानसभा मतदारसघस्तरीय भव्य 'समाधान शिबीर पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून आबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार दिलीपराव वळसे पाटील उपस्थित होते. यावेळी आबेगाव व शिरूरचे उपविभागीय अधिकारी, दोन्ही तालुक्याचे तहसीलदार आणि गटविकास अधिकारी, खेड उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी , तालुका कृषी अधिकारी, तालुका बालविकास अधिकारी तसेच आदिवासी विकास विभागाचे अधिकारी याची प्रमुख उपस्थिती होती.पाटील म्हणाले, शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत जलद गतीने आणि एकाच छताखाली पोहोचावा, हा या समाधान शिबीराचा मुख्य उद्देश आहे. सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांचे प्रश्न प्रशासनाने तत्परतेने सोडवून त्याना शासकीय सेवाचा थेट लाभ द्यावा, असे आवाहन पाटील यांनी केले. मागील कार्यक्रमामध्ये आंबेगाव तालुक्यातील ९,७१८ आणि शिरूर तालुक्यातील ५,१५० नागरिकाना विविध शासकीय योजनाचा लाभ मिळाला होता. याच साखळीत आज पार पडलेल्या शिबीरामध्ये दोन्ही तालुक्यांतील एकूण ८१६ लाभार्थ्यांना थेट सेवा व दाखल्याचे वाटप करण्यात आले.

# दखल

## आषाढी एकादशीनिमित्त भाळवणीत विद्यार्थ्यांची ग्रामदिंडी



**भाळवणी :** पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील महात्मा फुले विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व आयझॅक इंग्लिश स्कूल या विद्यालयांच्या वतीने ज्ञानोबा-माऊलींच्या गजरात विलोभनीय दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. सर्व शाळांचे हजारो विद्यार्थी या सोहळ्यात सहभागी झाले होते. सोहळ्याची सुरुवात गावातून दिंडी काढून झाली. विठ्ठल-रखूमाई, वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी हाती टाळ घेत चंद्रभागेच्या तिरी, पाऊले चालती, विठ्ठलनामाची शाळा भरली यांसारखी भक्तीगीते व भजने तसेच वेगवेगळ्या अभंगांवर चिमुकल्या वारकऱ्यांनी ताल धरला होता. जास्तीत जास्त विद्यार्थी भगवा झेंडा हाती घेऊन यात सामील झाले होते, तर विद्यार्थिनींनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन सहभागी झाल्या होत्या. हा सोहळा पाहण्यासाठी पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे प्रा. नाईकवाडी बी.एस., तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आबुज, सर्व शाळेंचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक यांचे मोलाचे सहकार्य मिळाले व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडले. ग्रामस्थांनीही या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

## राशीनला देवाभाऊ कृषी माऊली सोहळा संपन्न



**राशीन :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टीचे दक्षिण महिला जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. प्रतिभा रेणुकर यांच्या पुढाकाराने देवाभाऊ कृषी माऊली सोहळा कार्यक्रम राशीन येथे श्री जगदंबा भक्तनिवास येथे संपन्न झाला. महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष चित्रा वाघ यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्रात शेतकरी महिलांसाठी जुलै २०२६ ला महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. याचे औचित्य साधून पहिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष सौ. चित्राताई वाघ, विधान परिषदेचे सभापती माननीय राम शिंदे साहेब व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाने व सहकार्याने महिला मोर्चा अहिल्यानगर दक्षिण च्या वतीने देवाभाऊ कृषी माऊली सोहळा कार्यक्रम दि. २७ जुलै रोजी राशीन मंडल मध्ये घेण्यात आला. यावेळी कांचन मांढरे, अ‍ॅड. प्रतिभा रेणुकर, आशाताई वाघ, काजल कदम, सपना रेणुकर, नीता कचरे, आरती थोरात, कु. साक्षी वाघ, अंजली मांढरे, स्वाती काळे, निकिता काळे व राशीन मंडल पदाधिकारी उपस्थित होते.

## संतोष नरसाळे यांचा पदोन्नती बद्दल सत्कार



**भाळवणी :** अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे भाळवणी शाखेत कॅशिअर पदावर कार्यरत असलेले संतोष नरसाळे यांची जामगाव शाखेत शाखाधिकारी या पदावर पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा भाळवणी सेवा सोसायटीच्या वतीने सत्कार करण्यात आला. तर भाळवणी शाखेत क्लार्क पदावर कार्यरत असलेल्या अनिल नरसाळे यांची कॅशिअर पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी विकास रोहोकले, गंगाधर रोहोकले, बाबूशेठ रोहोकले, सुभाष रोहोकले, ज्ञानदेव रोहोकले, शिवाजी ठुबे, मुक्ताजी चेमटे, मुक्ता उंडे, सचिव मुरलीधर रोहोकले, सुरेश अडसूळ, दिपक शिंदे, शुभम कपाळे, तन्वी पवार, सविता बांगर, सदाशिव रोहोकले, संतोष साबळे मान्यवर उपस्थित होते.

## गोदड महाराज ट्रस्टच्या अधिपत्याखालीच सहायक धर्मादाय आयुक्त अहिल्यानगर आणि सेवेकरी

**कर्जत :** श्री श्री गोदड महाराज ट्रस्टला रथोत्सव करण्याची संपूर्णपणे परवानगी मिळाली असून सहायक धर्मादाय आयुक्त अहिल्यानगर यांनी गोदड महाराज ट्रस्टच्या अधिपत्याखालीच पारंपरिक सेवेकरी, मानकरी यांना सोबत घेत यंदाचा रथोत्सव साजरा करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला असल्याची माहिती ट्रस्टचे सचिव शशिकांत पाटील यांनी दिली. यावेळी ट्रस्टचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. मंगळवार, दि २८ जुलैपासून गोदड महाराज यांच्या नावाने ट्रस्टच्या व्यतिरिक्त कोणीही वर्गणी गोळा करू नये असे आवाहन ट्रस्टच्यावतीने करण्यात आले. याबाबत सहायक धर्मदाय आयुक्तांनी देखील २७ जून २०२५ रोजी योजना मंजूर केल्या असल्याने प्रतिवादीनी या योजनेच्या विरुद्ध अपील केले असले तरी आजमितीस त्यावर कोणत्याही प्रकारची स्थगिती आली नसल्याने ती योजना लागू आहे. त्यामुळे केवळ मानकरी असल्याने त्यांना स्वतंत्र समिती स्थापन करून निधी गोळा करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. किंवा ट्रस्टला समांतर कोणतीही समिती निर्माण करण्याचा महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाच्या उद्देशाच्या विरोधात असल्याने श्री गोदड महाराज ट्रस्टला रथोत्सव करण्याची संपूर्णपणे परवानगी दिली असून सहायक धर्मादाय आयुक्त अहिल्यानगर यांनी गोदड महाराज ट्रस्टच्या अधिपत्याखालीच पारंपरिक सेवेकरी, मानकरी यांना सोबत घेत यंदाचा रथोत्सव साजरा करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे.

## संभाजी ब्रिगेडचा नगरपरिषदेवर हल्लाबोल

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा नगरपरिषदेच्या कथित निष्क्रिय, उदासीन व अपारदर्शक कारभाराविरोधात संभाजी ब्रिगेडने आक्रमक भूमिका घेत ३ ऑगस्टपासून नगरपरिषद कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलनाचा इशारा दिला आहे.



सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शाम राम जरे यांनी दिली. संभाजी महाराज चौक सुशोभीकरणासाठी निधी मंजूर होऊनही अनेक वर्षांपासून काम रखडले असून शहरातील महत्त्वाच्या विकासकामांकडे नगरपरिषद सातत्याने दुर्लक्ष करत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच ऑनलाइन निविदा प्रक्रियेत पात्र ठेकेदार व संस्थांना अपात्र ठरवून स्पर्धा कमी केली जात असल्याने शासकीय नियमांचे उल्लंघन होत असून सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. १९ जून २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या 'नमो उद्यान' कामाच्या निविदेचा निर्णय अद्याप प्रलंबित असल्याबाबत कारणे जाहीर करून ती प्रक्रिया तातडीने पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# रोडरोमिओमुळे शिक्षणाची वाट बिकट!

## जेऊर परिसरात विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** जेऊर परिसरातील शाळा, महाविद्यालये आणि खासगी क्लासेसकडे जाणारे रस्ते सध्या रोड रोमीओंच्या उपद्रवामुळे विद्यार्थिनींसाठी धोकादायक ठरत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. सोमवार रोजी गावातील नामांकित विद्यालय सुटल्यानंतर मंजोबा चौकात दहावीच्या एका विद्यार्थ्यावर झालेल्या हल्ल्यामुळे रोड रोमिओंचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेला मुलींच्या छेडछाडीची किनार असल्याची परिसरात चर्चा असून रोड रोमीओंचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

जेऊर येथे बहिरवाडी, वाघवाडी, तोडमलवाडी, ससेवाडी, चापेवाडी, इमामपूर, ठोंबरे वस्ती, शेटे वस्ती, धनगरवाडी, आढाववाडी तसेच इतर वाड्या वस्त्यांवरून दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षणासाठी ये-जा करतात.

**'सेफ झोनची अपेक्षा'!**

रोड रोमीओंवर तातडीने कठोर कारवाई करावी. निर्जन रस्त्यांवर नियमित गस्त वाढवावी. विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे. शाळा, महाविद्यालये व खासगी क्लासेस परिसर 'सेफ झोन' घोषित करण्याची मागणी पालकांमधुन होत आहे.

शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत काही तरुणांकडून भरधाव दुचाकी चालवणे, मुलींना कट मारणे, अश्लील हावभाव करणे, पाठलाग करणे तसेच दारूच्या नशेत धिंगाणा घालण्याचे प्रकार सातत्याने घडत असल्याची तक्रार आहे. दहावीच्या मुलावर झालेल्या हल्ल्यात मुलाच्या डोळ्याच्या वर गंभीर जखम झाली आहे.

यापूर्वी विद्यालय प्रशासन, ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यात निवेदने देऊन कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली होती. शिक्षकांना दमदाटी करणे, तसेच तरुणांमध्ये आपआपसात

**दहावीच्या विद्यार्थ्यावर हल्ला ; संतापाचा उद्रेक**




मारहाणीचे प्रकारही घडलेले आहेत.

परिसरातील अनेक रस्ते निर्जन असल्याने विद्यार्थिनींना अधिक असुरक्षित वाटत आहे. त्यामुळे अनेक पालक स्वतःची कामे बाजूला ठेवून मुलींना शाळेत सोडण्यासाठी व आणण्यासाठी येत असल्याचे चित्र आहे. शिक्षणात अडथळा येईल किंवा बदनामी होईल या भीतीने अनेक विद्यार्थिनी घडलेल्या घटना घरी किंवा शाळेत सांगत नसल्याचेही बोलले जात आहे. याचाच गैरफायदा काही समाजकंटक घेत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# पारनेर तालुक्यातील ५७४१ शेतकऱ्यांना कर्जमाफी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेतकऱ्यांना ४० कोटी ३७ लाख रकमेचा मिळणार लाभ**

**टाकळी ढोकेश्वर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या सोसायटी कार्यालयासह विविध बँकांमध्ये लागल्या आहेत. त्यात दोन लाखांपर्यंत कर्ज असलेल्या ५७४१ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे. त्यांच्या खात्यात ४० कोटी ३७ लाख ३० हजार ८०५ रुपये जमा होणार आहेत.मात्र तालुक्यातील २४८३ शेतकऱ्यांना ३७ कोटी ४५ लाखांची कर्जमाफी मिळण्याची अजुन प्रतिक्षा आहे.पात्र शेतकऱ्यांनी तातडीने 'अ‍ॅग्रीस्टॅक'वर नोंदणी करून आधार प्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन सहायक निबंधक विशाल दाते यांनी केले. सेवा सोसायटी व संबंधित बँक शाखांमध्येही कर्जमाफीच्या याद्या प्रसिद्ध केल्या आहेत. तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांच्या याद्या सोसायटी कार्यालयात लावल्यानंतर गावागावात शेतकऱ्यांनी याद्या पाहण्यासाठी गर्दी केली होती. याद्याबाबत अद्याप कुठल्याही शेतकऱ्याची तक्रार नाही. शेतकऱ्यांनी आपले नाव व कर्ज रकमेची खात्री करूनच आधार प्रमाणीकरण केवायसी करावी. शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण करण्यास काही तांत्रिक अडचणी येऊ शकतात, तसेच इतर तक्रारींसाठी सोसायटी सचिव वा सहायक निबंधक कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन सहायक निबंधक पारनेर यांनी केले आहे.

# जामखेडमध्ये वैद्यकीय कक्ष लवकरच : बाफना

## तपनेश्वर शाळेला शिवसेनेकडून प्रथमोपचार किटचे वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**जामखेड :** विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शाळांमध्ये प्रथमोपचाराची सुविधा उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक असून, आरोग्याच्या समस्या उद्भवल्यास प्रथमोपचार किटमुळे तातडीने मदत मिळू शकते. या उद्देशाने जामखेड तालुक्यातील शाळांना प्रथमोपचार पेट्यांचे वाटप सुरू करण्यात आहे. अशी माहिती युवा नेते आकाश बाफना यांनी दिली.

शिवसेना महाराष्ट्र राज्याचे पक्ष सचिव राम रेपाळे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्यदूत मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली, युवा नेते आकाश बाफना यांच्या संकल्पनेतून तसेच सामाजिक कार्यकर्त्या पायलताई बाफना मित्र परिवार आणि शिवसेना जामखेड तालुका यांच्या वतीने शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तपनेश्वर तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुले व मुली) येथे प्रथमोपचार पेट्यांचे मंगळवार रोजी वाटप करण्यात आले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन धनराज पवार, पांडुरंग माने, स्वप्निल खाडे, विकी पिंपळे, अशोक कुमटकर, दत्तात्रय जगताप, जयश्री मुकणे, मच्छिंद्र खैरे, जयश्री पाटील, मंगल सोलंकर, माता-पालक रेखा बळे, पूजा कुलकर्णी,गीता जिरेकर, कविता भोसले, नीता भोसले, शितल क्षिरसागर,व शुभांगी अडाले, शिवकन्या राजगुरू तसेच पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुख्याध्यापक मच्छिंद्र खैरे यांनी केले, तर आभारप्रदर्शन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनराज पवार यांनी केले.

# बौद्ध महासभेच्या शेवगाव शहराध्यक्षपदी साळवे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** भारतीय बौद्ध महासभेच्या शेवगाव शहराध्यक्षपदी सुनील साळवे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे अशी माहिती भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष सुरेश घोक्षे यांनी दिली आहे. या बाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, गेली अनेक महिन्यापासून शेवगाव शहर बौद्ध महासभेच्या कार्यकारिणीचे भिजत घोंगडे पडले होते. मात्र जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या मागणीने जोर धरल्याने ती कार्यकारिणी अखेर अस्तित्वात आली असून या संदर्भात जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, भगवंत गायकवाड, विजय हुसळे, बाळासाहेब धस, अरुण भोंगळे, गोरख केदारे, गौतम पाचारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत शेवगाव येथे पैठण मार्गावरील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर भवनात तालुका पदाधिकाऱ्यांसह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच बैठक संपन्न झाली. यावेळी सुनील साळवे, दत्तात्रय निकाळजे, भानुदास गायकवाड, सतिष ठोंबे, गोरक्ष शेलार, प्रवीण मगर, भगवान गंगावणे, राजेंद्र मगर, अमोल निळे, पवन धस, अभिजित निकाळजे, अप्पासाहेब सोनवणे, संदीप म्हस्के, बाळासाहेब बळीद, रमेश ससाणे, बनसोडे, बाळासाहेब लहासे, विक्रम बल्लाळ या प्रमुखासह इतरही कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रा. नष्टे यांना राज्यस्तरीय पुरस्कार



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशिन :** कर्जत तालुक्यातील राशीन येथील समाज विकास संस्थेच्या हशू आडवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रा. राजेंद्र नष्टे यांच्या शैक्षणिक नेतृत्वाबरोबरच समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली असून त्यांना 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी खा. निलेश लंके, राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. शंकर अंदानी, अहमदनगर बार असोसिएशनचे अ‍ॅड. आनंद सूर्यवंशी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प्रा. राजेंद्र नष्टे यांनी कोरोनाकाळात मॉर्निंग वॉक टीमच्या माध्यमातून कर्जत येथील जिल्हा उपरुग्णालयाला १५० ऑक्सिजन सिलेंडर उपलब्ध करून देत रुग्णसेवेसाठी मोठे योगदान दिले. तसेच एलआयसीच्या कमिशनमधून आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शिक्षणाची ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य केले. त्यांच्या या सामाजिक व शैक्षणिक योगदानाची दखल घेत त्यांना हा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार बहाल करण्यात आला. यावेळी अल्लाउद्दीन काझी, शाहू भोसले, राजेंद्र देशमुख, शंकर देशमुख, शाम कानगुडे, रामकिसन साळवे, रामशेठ कानगुडे, अशोक जंजिरे, दादा परदेशी, संदीप देवा सांगडे, मनोज बोरा, संदेश घोसे, कमलेश साळवे, अमोल कुलथे, सूरज परदेशी, गुड्डू काझी, अविनाश मासाळ, दिलीप नष्टे, भुजंगराव कदम, एन. एस. पाटील, पांडुरंग भंडारी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सावकारकीच्या विळख्यात शेतकरी कुटुंब

## जिल्हा उपनिबंधक, पो. अधीक्षक यांना निवेदनाद्वारे न्यायाची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** तालुक्यातील एका शेतकरी कुटुंबाची खाजगी सावकाराने सुमारे तीन एकर शेती बळकावल्याचा आरोप उपनिबंधक तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे. नामदेव उमाप, उत्तम उमाप, वसंत उमाप, ताराबाई वाघमारे यांनी याबाबत निवेदन दिले असून निवेदनामध्ये खाजगी सावकारकीबाबत विविध आरोप करण्यात आले आहेत.

निवेदनानुसार अर्जदारांनी २०१६ मध्ये आर्थिक अडचणीमुळे खाजगी सावकाराकडून व्याजाने रक्कम घेतली होती. त्यानंतर मूळ रकमेपेक्षा अनेक पटींनी अधिक रकमेची मागणी करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. व्याजाच्या व्यवहारातून दबाव निर्माण करून त्यांच्या मालकीच्या शेतीसंदर्भातील कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

> सदर जमिनीचा व्यवहार संपूर्णपणे खाजगी सावकारकीतुनच झालेला आहे. संबंधित सावकाराचे ठरलेल्या व्याजासह पैसे देण्याची तयारी दाखवून देखील जमिनीची परस्पर विक्री करण्यात आली आहे. खाजगी सावकारकीबाबतचे सर्व पुरावे आहेत. तसेच व्यवहारात असणारे मध्यस्थी यांनाही संपूर्ण प्रकरणाची माहिती आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून न्याय मिळणे गरजेचे आहे. अन्यथा संघटनेमार्फत कुटुंबीयांसह आमरण उपोषण करण्यात येईल. **वसंत उमाप**

संबंधित व्यवहारात त्यांच्या कुटुंबातील सर्व वारसांची संमती नसताना जमिनीचे दस्तऐवज तयार करण्यात आले. कोळपे आखाडा परिसरातील सुमारे तीन एकर शेती संबंधित सावकाराने खाजगी सावकारकीच्या पैशातून बाळकावल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण व्यवहाराची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात यावी त्यामध्ये सर्व बाबींचा उलगडा होईल असेही नमूद करण्यात आले आहे. जमीन परत मिळविण्यासाठी प्रयत्न केल्यानंतर त्यांना वारंवार मानसिक त्रास, दबाव व धमक्या दिल्या जात आहेत. सदर जमिनीची परस्पर विक्री केल्यानंतर त्याबाबत विचारणा केली असता जातीवाचक शिवीगाळ करून धमकावल्याचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण कुटुंब भयभीत वातावरणात जीवन जगत असल्याचा उल्लेख अर्जात करण्यात आला आहे. या प्रकारामुळे कुटुंबाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असलेली शेती हिरावली गेल्याने मोठे आर्थिक संकट ओढवल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

# घाडगे पाटील संकुलात बालदिंडी व ग्रंथदिंडी उत्साहात साजरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**ढोरजळगाव :** शिक्षणमहर्षी साहेबरावजी घाडगेपाटील शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संकुल, ढोरजळगाव येथे आषाढी एकादशीनिमित्त बालदिंडी व ग्रंथदिंडीचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले होते. श्री विठ्ठल-रुक्मिणी मुर्तीस पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत टाळ-मृदंगाच्या गजरात व जयघोषात बालदिंडी काढली. तसेच संत साहित्य, भारतीय संविधान व विविध ज्ञानपर ग्रंथांची ग्रंथदिंडी काढून वाचन संस्कृतीचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी अभंग, हरिपाठ व भक्तिगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी सचिन कर्डिले, प्रा. आशिष भारती, प्रा. संजय बुधवंत, संगीता झिंजुर्डे, श्रीराम बडे, शरद टेमकर, विनायक सातपुते, अशोक गाढे, संगीता आहेर, स्वाती सानप, यांचे मार्गदर्शन लाभले.

# निसर्ग बहरत असतानाच शेवगावात कुऱ्हाड!

## वन विभागाच्या निष्क्रीयतेवर नागरिकांचा संताप

**प्रविण खोमणे । राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** शेवगाव परिसरात सागवान लाकडाची अवैध वाहतूकी बरोबरच गोड बाभळ, लिंबाची झाडाची मोठ्या प्रमाणात होत आहे. नियमित गस्त वाढवून कार्यक्षम अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची मागणी. एकीकडे शासन स्तरावर मोठ्या थाटामाटात वृक्षारोपणाची उद्दिष्टे निश्चित करून कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना, दुसरीकडे प्रत्यक्ष शेवगाव परिसरात मात्र भर पावसाळ्यात निसर्ग बहरात असतानाच मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. वन विभागाचे दुर्लक्ष, गस्तीचा अभाव आणि सागवान लाकडाची दिवसाढवळ्या होणारी वाहतूक यामुळे वन विभागाच्या एकूणच कार्यक्षमतेवर आणि भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**पावसाळ्यातच वनसंपदेचा ऱ्हास**

पावसाळा हा झाडे, वेली आणि वनसंपदा फुलण्याचा अन् वाढण्याचा काळ मानला जातो. मात्र, याच काळात शेवगाव आणि परिसरात कुऱ्हाडीचा धाक वाढला आहे. हिरवीगार झाडे तोडली जात असल्याने पर्यावरणप्रेमींमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. शासकीय पातळीवर कागदावर झाडे लावण्याचे टार्गेट दिले जाते, पण दुसरीकडे डोळ्यांदेखत



होणाऱ्या वृक्षतोडीकडे डोळेझाक केली जाते, असा थेट आरोप स्थानिकांनी केला आहे.

**केवळ टेबलवर्क आणि बिबट्या पुरतेच काम? चालू आहे का.**

स्थानिकांनी नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, वन विभागाचे कर्मचारी आणि अधिकारी प्रत्यक्ष क्षेत्रात (फिल्डवर) उतरून नियमित पाहणी अथवा गस्त (पेट्रोलिंग) करताना दिसत नाहीत.

वन कर्मचाऱ्यांचे काम केवळ कार्यालयीन कामकाजापुरते आणि बिबट्याची माहिती आल्यास तेवढ्यापुरतेच मर्यादित राहिल्याची टीका होत आहे.

वनविभाग वृक्षतोड करणाऱ्यांचे आणि अवैध लाकूड व्यावसायिकांचे धाडस वाढले आहे.

पाथर्डी-शेवगाव रस्त्यावर दिवसाढवळ्या सागवान वाहतुकीबरोबर इतर लाकडांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होताना दिसत आहे. शेवगाव शहरातून आणि पाथर्डी-शेवगाव मार्गावरून दिवसाढवळ्या टेम्पोमधून हिरवेनेट ,जाळे (हिरो नेट) लावून लाकडाची कथित अवैध वाहतूक सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शेवगाव शहरातील लाकूड कापण्याच्या गिरण्यांमध्ये (सॉ मिल) सध्या लाकडाचा प्रचंड साठा दिसून येत आहे.

हा संपूर्ण व्यवसाय नेमका कोणाच्या आशीर्वादाने आणि आश्रयाने सुरू आहे? अधिकाऱ्यांच्या मर्जीनेच हे सर्व चालले आहे का? असा रोखठोक सवाल नागरिक विचारत आहेत.

**पाथर्डी वन विभाग पुन्हा चर्चेत**

पाथर्डी वन विभागाचा उल्लेख यापूर्वीही विविध कारणांमुळे वादग्रस्त ठरला आहे. कथित सागवान प्रकरण असो वा वन पर्यटनाशी संबंधित बाबी, हा विभाग वारंवार चर्चेत आला आहे. त्यामुळे आता या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे.

नागरिकांच्या अन् पर्यावरणप्रेमींच्या प्रमुख मागण्या असून सखोल चौकशी व कारवाई करून अवैध वृक्षतोड आणि सागवान लाकडाच्या संशयास्पद वाहतुकीची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष चौकशी व्हावी.

वन विभागाने कार्यालयात न बसता शेवगाव-पाथर्डी परिसरात तातडीने नियमित गस्त (पेट्रोलिंग) सुरू करावी.

## कोल्हार-घोटी रस्त्यावर आढळला अनोळखी पुरुषाचा मृतदेह

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अकोले :** कोल्हार-घोटी रस्त्यालगत असलेल्या स्मशानभूमीजवळ एका साधारण ४५ वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृतदेह ओढ्यात आढळून आला. ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, रस्त्याकडील खड्ड्यात एक मृतदेह पडल्याची प्राथमिक माहिती ग्रामस्थ पथवे यांनी राजूर पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह खड्ड्यातून बाहेर काढून पुढील तपासणी व शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नाही. याप्रकरणी राजूर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# रेल्वे मार्गाविरोधात शेतकरी आक्रमक

## बाधितांच्या भावना रेल्वेमंत्र्यांपर्यंत पोहोचवणार : मुख्यमंत्री फडणवीस

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी / सोनई :** शनीशिंगणापूर प्रस्तावित रेल्वे मार्गाला राहुरी व नेवासा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत असलेल्या तीव्र विरोधाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधानपरिषद सदस्य प्राजक्त तनपुरे आणि नेवासा मतदारसंघाचे आमदार विठ्ठलराव लंघे यांनी मंगळवारी (दि. २८) जुलै रोजी मुंबईतील मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी हा रेल्वे मार्ग रद्द करण्याची मागणी केली. या विषयावर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा करून बाधित शेतकऱ्यांच्या भावना त्यांच्यापर्यंत पोहोचवू, असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याने शेतकऱ्यांमध्ये आशादायी वातावरण निर्माण झाले आहेत.

धार्मिक पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने राहुरी-शनीशिंगणापूर या २१.८४ किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गाला मंजुरी दिली आहे. मात्र हा मार्ग राहुरी व नेवासा तालुक्यातील बागायती व अत्यंत सुपीक जमिनींमधून प्रस्तावित असल्याने दोन्ही तालुक्यांतील सुमारे ९०० हून अधिक शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित होणार आहेत. राहुरी तालुक्यात सुमारे ५०.३३२८ हेक्टर, तर नेवासा तालुक्यातील सोनई परिसरातील सुमारे ४३ हेक्टर क्षेत्र या प्रकल्पामुळे बाधित होणार असल्याचे सांगितले जात आहे. रेल्वे मार्गाची मोजणी करण्यासाठी



भूमी अभिलेख विभागाचे पथक परिसरात आल्यानंतर शेतकऱ्यांनी एकत्र येत तीव्र विरोध नोंदविला होता. त्यानंतर बाधित शेतकऱ्यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहत त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला होता.

पुढे उंबरे येथे आयोजित बैठकीत शेतकऱ्यांनी रेल्वे कृती समितीची स्थापना केली असून, या समितीच्या नेतृत्वाची जबाबदारी आ.तनपुरे यांनी स्वीकारली होती. मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत आ.प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी-शनीशिंगणापूर रेल्वे मार्गाला दोन्ही तालुक्यांतील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असल्याचे स्पष्ट केले. बाधित शेतकऱ्यांच्या सुपीक व बागायती जमिनी वाचविण्यासाठी हा रेल्वे मार्ग रद्द करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच रेल्वे मार्गासाठी आवश्यक साहित्य परिसरात दाखल झाल्याची माहिती शेतकऱ्यांकडून मिळाल्याचेही त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

राहुरी तालुक्यात यापूर्वी मुळा धरण, महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि इतर विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात बागायती शेतजमिनी संपादित झाल्या आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा सुपीक जमिनींचे नुकसान होऊ देऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच शनीशिंगणापूरसाठी स्वतंत्र रेल्वे मार्ग उभारण्याऐवजी राहुरी तालुक्यातील पिंपरी अवघड येथून जाणाऱ्या विद्यमान रेल्वे मार्गावरच शनीशिंगणापूरसाठी रेल्वे थांबा विकसित करण्याचा पर्यायही त्यांनी सुचविला. यावेळी नेवासाचे आमदार विठ्ठलराव लंघे यांनीही नेवासा तालुक्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बागायती जमिनी या प्रकल्पामुळे बाधित होणार असल्याने या रेल्वे मार्गाला आपला ठाम विरोध असल्याचे मुख्यमंत्र्यांना सांगितले.

शेतकऱ्यांच्या हिताला बाधा पोहोचेल असा कोणताही निर्णय होऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही दोन्ही तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या भावना मुख्यमंत्र्यांसमोर मांडत या विषयावर सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती केली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी याबाबत चर्चा करून बाधित शेतकऱ्यांच्या भावना त्यांच्या निदर्शनास आणून देण्याचे आश्वासन दिले आहे.

मुख्यमंत्र्यांकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे प्रस्तावित रेल्वे मार्गाविरोधातील लढ्याला नवे बळ मिळाल्याची भावना रेल्वे कृती समिती आणि बाधित शेतकऱ्यांनी व्यक्त केली असून, पुढील निर्णयाकडे दोन्ही तालुक्यांतील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## ९ वर्षांपासून फरार असलेला आरोपी अखेर जेरबंद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वॉरंट बजावण्याच्या मोहिमेदरम्यान पोलिसांनी मोठी कारवाई करत, मागील सुमारे ९ वर्षांपासून गंभीर गुन्ह्यात फरार असलेल्या बाबा नानासाहेब माघाडे (रा. दत्तनगर, श्रीरामपूर) यास २८ जुलै २०२६ रोजी शिताफीने जेरबंद केले. सन २०१७ मध्ये श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न व दंगलीसारख्या गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले होते. सत्र न्यायालयात खटला सुरू झाल्यापासून हा आरोपी सातत्याने पोलिसांना गुंगारा देत फरार होता. न्यायालयाने वॉरंट जारी केल्यानंतर पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय अधिकारी जयदत्त भवर व पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने ही मोठी कारवाई केली. पोलिसांनी आरोपीला अटक करून तात्काळ जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले आहे. पोलिसांच्या या कामगिरीबद्दल नागरिकांमधून त्यांचे कौतूक होत आहेत.

## शिर्डीत झाडाला गळफास घेत तरुणाची आत्महत्या



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शहरात ५०० रुम नजीक एका ३६ वर्षीय तरुणाने बाभळीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल उघडकीस आली आहे. शिर्डी शहरातून जाणाऱ्या नवीन रिंगरोडवर एका बंगल्यासमोरील शेतातील बाभळीच्या झाडाला एका तरुणाने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले होते. त्या बाबत शिर्डी पोलिसांना खबर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेहास खाली काढून पंचनामा केला असता मयत रुणाच्या खिशात मिळालेल्या आधारकार्ड मिळून आले.त्यावर संदीप समाधान घागे (वय ३६), रा. मदाखेड खुर्द, ता./ जि. बुलढाणा असे आढळून आले. संबंधित तरुण शिर्डीत नेमका कोणत्या कारणासाठी आला होता, तो येथे किती दिवसांपासून होता आणि त्याने इतके टोकाचे पाऊल का उचलले, याचा तपास सुरू असून आत्महत्येमागील कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## संत आले घरा, तोच दिवाळी दसरा : मंत्री राधाकृष्ण विखे

### श्रीक्षेत्र रामगिरी महाराजांनी मुंबईत मुख्यमंत्री फडणवीस व विखेची घेतली भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर / झरेकाठी :** संत आले घरा, तोच दिवाळी दसरा! अशी भावना व्यक्त करत, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी श्रीक्षेत्र गोदावरी धाम, बेट सराला येथील सद्गुरु श्री गंगागिरीजी महाराज संस्थानाचे महंत पूज्य श्री रामगिरी महाराज यांच्या मुंबईतील 'रॉयल स्टोन' या शासकीय निवासस्थानी झालेल्या सदिच्छा भेटीबद्दल मनोगत व्यक्त केले.



या पावन प्रसंगी मंत्री विखे पाटील आणि पूज्य रामगिरी महाराज यांच्यात अत्यंत आत्मीय वातावरणात हितगुज झाले. पूज्य महाराजांच्या आगमनामुळे 'रॉयल स्टोन'चा संपूर्ण परिसर भक्तिमय, मंगलमय आणि चैतन्यमय वातावरणाने भारावून गेला होता. यावेळी, बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की,पूज्य महाराजांचे शुभआशिर्वाद प्राप्त झाले, ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. श्रींचे आशीर्वाद सदैव सर्वांवर आणि महाराष्ट्रावर राहोत, हीच याप्रसंगी प्रार्थना केली.

राहाता तालुक्यातील धनगरवाडी - वाकडी येथे होणाऱ्या आगामी १७९ व्या सद्गुरु गंगागिरी महाराज सप्ताहचे आमंत्रणानिमित्त महाराजांनी मुंबईत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन सोहळ्याचे निमंत्रण दिले आहेत.

या मंगलप्रसंगी शिर्डी विधानसभा मतदारसंघातील अनेक प्रमुख मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.ह.भ.प. मधुकर महाराज, प्रमोद राहणे,अभय शेळके, धनंजय धोरडे, रोहिणी निघते, दीपक पटारे, शहाजी गायकवाड, रावसाहेब गायकवाड, अर्जुन हाळणारे, अनिल नागरे, पंढरीनाथ वने, रंभाजी इलग, आदीसह शिर्डी मतदारसंघातील वारकरी संप्रदायाचे अनुयायी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुन्हेगारांना कोणतीही मुभा नाही

### आरोपीचे अतिक्रमित घर हटवणार : डॉ. सुजय विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शिर्डीत घडलेल्या खून प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक कडक करण्याबरोबरच मंदिर परिसरातील अनधिकृत व्यवसाय व अतिक्रमणांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात येणार असल्याची घोषणा भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी केली. खून प्रकरणातील आरोपी राहत असलेल्या अतिक्रमित घराला नोटीस बजावण्यात आली असून, आठवडाभरात अतिक्रमण हटविले नाही तर नगरपंचायतीमार्फत जेसीबीच्या साहाय्याने ते हटविण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. शिर्डीत घडलेली हत्या दुर्दैवी असून, गुन्हेगारांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही.



कायद्यापुढे सर्व समान असून नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल, असे डॉ. विखे यांनी स्पष्ट केले. मंदिर परिसरातील अनधिकृत विक्री रोखण्यासाठी स्वतंत्र हॉकर झोन विकसित करण्यात येणार असून, साई मंदिराच्या चारही बाजूंना कोणत्याही प्रकारची विक्री करण्यास परवानगी दिली जाणार नाही. पथविक्रेत्यांसाठी स्वतंत्र जागा निश्चित करून व्यवसायासंदर्भातील नियमावली ग्रामस्थ, व्यापारी आणि संबंधित घटकांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे. भाविकांची फसवणूक करणारे, जादा दर आकारणारे किंवा अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. अशा प्रकरणात संबंधित विक्रेत्यासह दुकानमालक आणि जागामालकावरही गुन्हे दाखल करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. तसेच फुले, प्रसाद, शाल व पूजासाहित्याच्या विक्रीबाबत साई संस्थानने स्पष्ट धोरण जाहीर करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

पथविक्रेत्यांसाठीची अंतिम नियमावली येत्या आठवडाभरात ग्रामस्थांच्या बैठकीनंतर जाहीर करण्यात येणार असून, सर्वांना न्याय देणारा कायमस्वरूपी तोडगा काढण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी शिर्डी पोलिसांच्या तत्पर कारवाईचे कौतुक करत, शहरात गुन्हेगारीला कोणतीही मुभा दिली जाणार नसल्याचा पुनरुच्चार केला.

## दुचाकीवरून देशी दारूची वाहतूक

### ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील झरेकाठी गावातील पाण्याच्या टाकीजवळ देशी दारूची बेकायदा वाहतूक करणाऱ्या एका युवकास अटक करून पोलिसांनी सुमारे ५२ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहेत.या कारवाईत देशी दारूच्या बाटल्यांसह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली दुचाकीही जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्याचे पो.शि.नामदेव गंगाधर बिरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रशांत अण्णासाहेब आहेर (रा. झरेकाठी, ता. संगमनेर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, (दि.२७ ) जुलै रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास झरेकाठी गावातील पाण्याच्या टाकीजवळ गस्तीदरम्यान ही कारवाई करण्यात आली. आरोपी त्याच्या ताब्यातील हिरो होंडा कंपनीच्या डीलक्स मोटारसायकल क्रमांक (एमएच-१७-डि.डि.९४३२) या दुचाकीवर काळ्या रंगाच्या पिशवीत देशी दारू विक्रीच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याचे आढळून आले. या झडती दरम्यान पोलिसांनी बॉम्बे संत्रा देशी दारूच्या १०० मिलीच्या २६ सीलबंद बाटल्या जप्त केल्या. या दारूची किंमत २,०३० रुपये, तर दुचाकीची किंमत ५० हजार असून, एकूण ५२,०३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार बर्डे करीत आहेत. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## सोनईत अवैध दारूविक्रेत्यांवर स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

### तीन हॉटेलांवर कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध दारूविक्रेत्यांवर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने धडक कारवाई करत विविध ठिकाणांहून एकूण २३,३५० किमतीची विना परवाना देशी-विदेशी दारू जप्त केली. या कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून चौघांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी संतोष मुटकुळे यांनी विशेष पथकाची नियुक्ती केली होती.

या पथकाने २७ जुलै रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी एकाचवेळी छापेमारी केली कारवाई दरम्यान अंमळनेर शिवारातील पानेगाव रोडवरील 'हॉटेल पाटीलवाडा' येथे लकी जितमन राणा (वय २६, रा. अस्तगाव, ता. राहाता) हा विना परवाना दारू विक्री करताना आढळून आला. तसेच 'हॉटेल सावली' येथे प्रकाश बाळू भोसले (वय३४,रा.निंभारी) याच्याकडूनही अवैध दारू विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले. या दोन्ही ठिकाणांहून विविध कंपन्यांची १९,७०० किमतीची दारू जप्त करण्यात आली. यानंतर घोडेगाव-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील 'हॉटेल चिराग' येथे अल्ताफ इस्माईल शेख (वय ४२, रा. घोडेगाव) हा विना परवाना दारू विक्री करताना आढळून आला.

त्याच्याकडून १,९३० किमतीची दारू जप्त करण्यात आली. तसेच सोनई-खेडले रोडवरील 'हॉटेल साम्राज्य' येथे निवृत्ती कर्णासाहेब होन (वय ३०, रा. शिरेगाव) याच्याकडून १,७२० किमतीची अवैध दारू जप्त करण्यात आली.या सर्व कारवाईत मिळून २३,३५० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस कॉन्स्टेबल योगेश कर्डीले यांच्या फिर्यादीवरून संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सोनई पोलीस ठाणे करीत आहे.

अवैध दारू विक्री, मटका, जुगार आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात अशाच प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले असून, या कारवाईमुळे परिसरातील अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.